cmyk

## संपादकीय

### वाचाळांचे तोंड शीवण्याची वेळ

केवळ महाराष्ट्रच नव्हे तर मराठी माणूस जिथे जिथे आहे तेथे त्यांना छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज हे वंदनीय आणि आदरणीय आहेत. पण कोणतरी येतो आणि भावनेच्या भरामध्ये एखादे वक्तव्य करून जातो आणि त्यामुळे विनाकारण समाजात दुहीची आणि द्वेषाची निर्मिती केली जाते. महापुरुषांची विटंबना असो किंवा महापुरुषांबाबत केलेली आक्षेपार्ह विधाने असो यामुळे महाराष्ट्रातच नव्हे तर देशात अनेक ठिकाणी गंभीर स्वरूपाच्या दंगलीसुद्धा घडल्या आहेत आणि सामाजिक वातावरण बिघडून गेले आहे.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com







बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–३११ | बुधवार, दि.५ मार्च २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

# हडप केलेली जमीन परत करा!

**पणन मंत्री जयकुमार रावल यांना न्यायालयाचा दणका; २६ एकर जमीन हडप केल्याचे प्रकरण**

**धुळे । प्रतिनिधी**

**धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यानंतर महायुतीच्या आणखी एका नेत्यासंदर्भात महत्त्वाची बातमी समोर आली आहे. राज्याचे पणन व राज्य शिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांना हडप केलेली जमीन परत करण्याचे आदेश धुळे जिल्हा न्यायालयाने दिले आहेत. मंत्री रावल यांच्या कुटुंबाने धुळे जिल्ह्यातील दोंडाई शिवरातील २६ एकर जमीन हडप केल्याचं धक्कादायक प्रकरण समोर आले आहे.**



माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांची दोंडाई शिवारातील जमीन मंत्री जयकुमार रावल यांनी हडप केल्याचा आरोप माजी आमदार अनिल गोटे यांनी केले आहेत. मुंडे यांच्या राजीनाम्याने महायुतीची पहिली विकेट पडली आहे. तर विद्यमान कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्याही राजीनाम्याची मागणी केली जात आहे. जमीन हडपल्याच्या प्रकरणात गैरव्यवहार केल्याचा ठपका मंत्री जयकुमार रावल यांच्यावर ठेवण्यात आला आहे. तसेच या प्रकरणात हडप केलेली जमीन परत करण्याचे आदेश धुळे न्यायालयाने दिले आहेत. त्यावरून माजी आमदार अनिल गोटे यांनी रावल यांच्यावर टिका केली आहे.

पान २ वर

## धनंजय मुंडेंच्या जागी आता कोण होणार मंत्री?

**चर्चांना उधान ; चौघांची नावे चर्चेत**

**बीड । प्रतिनिधी**

**सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराडबरोबर जवळीक असल्याने धनंजय मुंडेंना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागाला आहे. धनंजय मुंडे यांनी मंगळवारी मंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांच्याऐवजी आता पक्षाकडून कोणाला मंत्रिमंडळात संधी देण्यात येणार? याची चर्चा सुरु झाली आहे. दरम्यान, राष्ट्रवादीकडून चार जणांच्या नावांची चर्चा होत आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील चौघांची नावे मंत्रिपदासाठी चर्चेत आहेत. या चौघांपैकी एकाची वर्णी धनंजय मुंडेच्या जागी लागणार

पान २ वर

# आरोपींना आमच्या ताब्यात द्या !

## बीड जिल्ह्यात कडकडीत बंद अन् संताप





**बीड । प्रतिनिधी**

**केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण केल्यानंतर त्यांना झालेली मारहाण ही कौर्याची परिसिमा पार करणारी होती. आरोपी कौर्यकृत्यावरच थांबले नाहीत तर त्यांनी संतोष देशमुख यांच्यासोबत घृणास्पद कृत्य करुन त्याचा असुरी आनंदही घेतला. याबाबतचे फोटो सोमवारी समोर येताच जिल्ह्यात संतापाची लाट उसळली. या संतापामुळेच सोमवारी रात्री उशिरा बंदची घोषणा करुन मंगळवारी (दि.४) संपुर्ण जिल्ह्यात बंद पाळण्यात आला. यावेळी संतप्त नागरिकांनी आरोपींना आमच्या ताब्यात द्या, आम्ही न्याय करू, अशा शब्दांत संताप व्यक्त केला.**

९ डिसेंबर २०२४ रोजी संतोष देशमुख यांचे अपहरण करुन हत्या करण्यात आली. वाल्मीक कराडने अवादा कंपनीला मागीतलेल्या दोन कोटी रुपयांच्या खंडणीला आड आल्यानेच संतोष देशमुख यांची हत्या झाल्याचे गुन्हे अन्वेषण विभागाच्या आर्थिक गुन्हे शाखेचे पोलिस उपमहानिरीक्षक डॉ. बसवराज तेली यांच्या अध्यक्षतेखालील विशेष तपास पथकाच्या तपासातून समोर आले. तसे दोषारोपही दाखल करण्यात आले आहे. खंडणी व त्यातूनच खून झाल्याचे उघड झाले. दरम्यान, विशेष तपास पथकाने न्यायालयात दाखल केलेल्या दिड हजार पानांच्या दोषारोपत्रासोबत काही पुरावेही जोडले. या पुराव्यांत डिजीटल पुराव्यांमध्ये संतोष देशमुख यांना मारहाणीच्या व्हिडीओ चित्रणाचे स्क्रीनशॉट जोडण्यात आले. याचे फोटो समोर येताच राज्यात संतापाची लाट उसळली. मंगळवारी सकाळपासून दुकाने बंद ठेवण्यात आली. बीडमध्ये तरुणांनी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौकातून दुचाकी फेरी काढून बंदचे आवाहन केले.

पान २ वर

### राजीनाम्याप्रकरणी मुख्यमंत्र्यांवर आज हक्कभंग आणणार – नाना पटोले



मुंबईः बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या अत्यंत क्रुरपद्धतीने केली, याची गृहखात्याकडे माहिती नव्हती का? असा संपप्त सवाल करत मुख्यमंत्र्यांनी ही माहिती लपवली आणि धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची माहिती सभागृहाला न देता थेट प्रसार माध्यमांना दिली, हा सभागृहाचा अपमान आहे. याप्रकरणी मुख्यमंत्री फडणवीस यांच्यावर बुधवारी हक्कभंग आणू, असा इशारा ज्येष्ठ काँग्रेस नेते नाना पटोले यांनी दिला. विधिमंडळ परिसरात माध्यमांशी बोलताना नाना पटोले म्हणाले की, मुख्यमंत्र्यांनी प्रोटोकाल सोडून अजित पवार यांच्या शासकीय बंगल्यावर जाऊन रात्री चर्चा केली व त्यातून धनंजय मुंडे यांचा राजीनामा झाला. सरकारला या प्रकरणाची सर्व माहिती होती पण त्यांनी ती लपवली. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनातही मुख्यमंत्री फडणवीस यांनी खोटी माहिती देऊन सभागृह व जनतेची दिशाभूल केली. सरपंच हत्येमध्ये वाल्मिक कराड व त्याचे सहकारी आरोपी आहेत पण सरकारने या प्रकरणातील माहिती लपवल्याने त्यांनाही सरआरोपी केले पाहिजे, अशी मागणी सभागृहात करु असेही त्यांनी सांगितले.

### राज्यपालांनी स्विकारला धनंजय मुंडेंचा राजीनामा

मंगळवारी सकाळी मंत्री धनंजय मुंडे यांनी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना राजीनामा देण्यास सांगितले होते. त्यानंतर संध्याकाळी राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्याकडून धनंजय मुंडे यांचा राजीनामा मंजूर करण्यात आला आहे. राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू आहे, अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिला आहे. दोनच दिवसांपूर्वी सीआयडीने या प्रकरणात आरोप पत्र दाखल केले असून, त्यात वाल्मिक कराड हाच या घटनेचा मास्टरमाईंड आहे, संतोष देशमुख यांनी खंडणीला विरोध केल्यामुळे त्यांची हत्या करण्यात आली, असे सीआयडीने आपल्या आरोप पत्रात म्हटले आहे.. त्यानंतर सोमवारी सायंकाळी संतोष देशमुख यांच्या हत्येचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले. आरोपींनी संतोष देशमुख यांची अत्यंत क्रूरपद्धतीने हत्या केली. हे फोटो व्हायरल झाल्यानंतर राज्यभरात एक तीव्र संतापाची लाट पसरली आहे. त्यामुळे धनंजय मुंडे यांच्यावर राजीनाम्याबाबत दबाव वाढला होता.




### फडणवीस देशमुख कुटुंबाच्या भावनांशी खेळले – सुषमा अंधारे



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना संतोष देशमुख हत्याकांडाचे फोटो व व्हिडिओ अडीच महिन्यांपूर्वीच मिळाले होते. पण त्यानंतरही त्यांनी आपल्या पक्षाचा अजेंडा राबवण्यासाठी देशमुख कुटुंबीयांच्या भावनांचा खेळ मांडला. आता नैतिकतेच्या मुद्यावर त्यांनीही राजीनामा दिला पाहिजे, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केली आहे. सुषमा अंधारे मंगळवारी आपल्या एका ट्विटमध्ये म्हणाल्या की, आरोपीबद्दल खडानखडा माहिती असताना सुद्धा फडणवीसांनी जाणीवपूर्वक पक्षीय अजेंडा राबविण्यासाठी मौन बाळगले. सगळी माहिती फोटो व्हिडिओ हाताशी असून सुद्धा अडीच तीन महिने देशमुख कुटुंबीय आणि महाराष्ट्राच्या भावनांशी खेळणाऱ्या देवेंद्र फडणवीसांनी आधी नैतिकता म्हणून राजीनामा द्यायला हवा.

### फडणवीसांनी राजीनामा आधीच का घेतला नाही – उद्धव ठाकरे



राजीनामा कारवाई आधीच का झाली नाही असा प्रश्न निर्माण करत उद्धव ठाकरे यांनी सरकारच्या निर्णयाचे स्वागत केले. संतोष देशमुख यांच्या हत्येच्या घटनेचे फोटो सरकारकडे आधी आले नव्हते का? जर फोटो आले असतील तर धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची कारवाई आधीच का झाली नाही,'' डिसेंबरपासून बीडच्या घटनेची चर्चा सुरू आहे. राजीनामा देताना त्यांनी तब्येतीचे कारण दिले. मी त्यांच्या तब्येतीबाबत काही बोलणार नाही पण राजीनामा देण्याचे कारण नेमके काय? नैतिक जबाबदारी की तब्येतीचे कारण? या प्रश्नाचे उत्तर मुख्यमंत्री फडणवीस यांनी द्यायला हवे, असाही सवाल ठाकरे यांनी विचारला.

### राज्यपालांकडून कारवाई करण्याचे बजावल्यानंतर राजीनामा ?

पुढे आलेल्या माहितीनुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार या दोघांनीही धनंजय मुंडे यांना राजीनामा देण्यास सांगितले होते. स्वत: मुख्यमंत्र्यांनीही त्यांना राजीनामा द्या असे स्पष्टपणे सांगितले होते. तरीही धनंजय मुंडे ऐकायला तयार नव्हते. धनंजय मुंडे हे काही केल्या राजीनामा देत नाही हे पाहून मुख्यमंत्री संतापले होते. सोमवारी संतोष देशमुख यांच्या हत्येचे भयावह फोटो जगासमोर आले. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी धनंजय मुंडे यांना निर्वाणीचा इशारा दिला होता. तुम्ही राजीनामा देणार नसाल, तर मला राज्यपालांना पत्र लिहून तुम्हाला मंत्रिमंडळातून काढण्याची कारवाई करावी लागेल, असे मुख्यमंत्री फडणवीसांनी बजावले होते. यानंतर चक्रे वेगाने फिरली आणि धनंजय मुंडे यांनी नमते घेत आपला राजीनामा मुख्यमंत्र्यांना सादर केला होता. त्यांचा राजीनामा मिळताच तो तातडीने स्वीकारण्यात आला.

### राजीनामा आगोदरच व्हायला हवा होता – पंकजा मुंडे



धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यानंतर त्यांच्या भगिनी आणि भाजपाच्या मंत्री पंकजा मुंडें यांनी आपली प्रतिक्रिया देताना म्हटले की, धनंजय मुंडे यांचा राजीनामा झाला आहे. मी त्याचे स्वागत करते. हा राजीनामा फार आधी व्हायला पाहिजे होता. या राजीनाम्यापेक्षा शपथच व्हायला नको होती. पंकजा मुंडे यांच्या या बोलक्या प्रतिक्रीयानंतर उलटसूलट प्रतिक्रीया उमटू लागल्या आहेत.

### वाल्मीक कराडसह सर्व आरोपींना फासावर चढवा– आ.संदीप क्षीरसागर



धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्यावा ही प्रकरण उघडकीस आल्यापासूनची आमची मागणी होती. ती आता पूर्ण झालेली आहे. कारण वैयक्तिक वाल्मिक कराड स्वतः एवढा मोठा नाही की, त्याच्यावर गुन्हा दाखल व्हायला इतका वेळ लागतो. त्याच्या सांगण्याप्रमाणे प्रशासनातील अधिकारी काम करतात. यामागे निश्चित धनंजय मुंडे यांची राजकीय शक्ती होती. त्यामुळे धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेणे क्रमप्राप्त ठरत होते. परवा तपास यंत्रणांकडून दाखल केलेल्या चार्जशीट मधील स्व.संतोष देशमुख यांना मारहाण केल्याचे फोटो आणि व्हिडिओ समोर आले. अक्षरशः काळजाला पीळ पडावा असे ते सगळी दृश्य आहेत. माणूसकी मेल्याचे हे सर्व पाहून जाणवते. महाराष्ट्रातील प्रत्येक माणसाच्या डोळ्यात ते फोटो आणि व्हिडिओ पाहिल्यानंतर पाणी आल्याशिवाय राहिले नाही. इतका बिभत्स तो प्रकार आहे. स्व.संतोष देशमुखांचे नराधम मारेकरी म्हणजे माणूसकीला लागलेले कलंक आहेत. त्यामुळे या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराडसह सर्व मारेकर्यांना लवकरात फासावर चढवा. अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. तसेच सध्या चर्चा होत असल्याप्रमाणे जर खंडणीसाठी मंत्री धनंजय मुंडे यांच्या शासकीय बंगल्यावर बैठक झाली असेल आणि स्वतः धनंजय मुंडे त्या बैठकीला उपस्थित होते. ही बाब सत्य असल्याचे पडताळून त्यांनाही या प्रकरणात सहआरोपी करण्यात यावे असेही आ.क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

## कोरटकर, सोलापूरकर यांच्या विरोधात बोलत असताना सत्ताधाऱ्यांकडून माईक बंद

**विरोधी पक्षनेते अंबादास दानवें यांचा गंभीर आरोप**

**मुंबई । प्रतिनिधी**

**प्रशांत कोरटकर, राहुल सोलापूरकर यांनी अखंड हिंदुस्थानाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल अवमानकारक वक्तव्य केली. याप्रकरणी विधानपरिषद सभागृहात आवाज उठवित असताना विरोधी पक्षनेत्यांचा सत्ताधाऱ्यांकडून माईक बंद करण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला.**



राज्य सरकार विरोधी पक्षाचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करत आहे. अबू आझमी यांनी क्रूर बादशहा औरंगजेब याचे उदात्तीकरण होईल, असे वक्तव्य केले. प्रशांत कोरटकर यांनी इतिहासकार इंद्रजीत सावंत यांना धमकी दिली आहे. राहुल सोलापूरकर यांनीसुद्धा छत्रपती शिवाजी महाराज यांचा विकृतपणे इतिहास मांडला असल्याने या तिघांवर एकत्र कारवाई करण्यात यावी, अशी मागणी दानवे यांनी केली. अबू आझमी यांचे विधानसभा सभागृहाचे सदस्यत्व रद्द करण्यात आले पाहिजे, अशा प्रकारे

पान २ वर

## ओबीसींवरील अत्याचारावेळी ओबीसी नेते कुठे असतात?

**प्रकाश आंबेडकर यांचा सवाल**




मुंबई । प्रतिनिधी

निवडणुकीच्या तोंडावर ओबीसी नेते मिरवताना दिसतात. पण प्रत्यक्षात ओबीसींवरील अन्याय अत्याचाराच्या विरोधात आवाज उठवण्याची वेळ येते तेव्हा हेच ओबीसी नेते कुठे गायब होतात? असा सवाल वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी उपस्थित

पान २ वर

## महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुन्हा लांबल्या

**● दोघांनाही बाजू न मांडता आल्याने न्यायालयाकडून संताप**

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था प्रकरणाची सुनावणी मंगळवारी (दि.४) सर्वोच्च न्यायालयात काही मिनीटे पार पडली. मात्र, दोन्ही बाजूंना आपले म्हणणे स्पष्टपणे न मांडता आल्यामुळे न्यायालयाने संताप व्यक्त केला. आणि पुन्हा एकदा ही सुनावणी लांबणीवर पडली. या प्रकरणाची सुनावणी आता कधी होणार, हे अद्याप अस्पष्ट आहे.**

मंगळवारी पार पडलेल्या सुनावणीत सुरूवातीलाच सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी राज्य सरकारच्या वतीने न्यायालयाला दोन



दिवसांचा वेळ मागितला होता. याचिकाकर्त्यांनी या गोष्टीचा विरोध केला. यावर न्यायालयाने दोन्ही बाजूंना या प्रकरणासंबंधी विचारणा केली. न्यायालयाने केलेल्या

पान २ वर

cmyk

अग्रलेख

# वाचाळांचे तोंड शीवण्याची वेळ

केवळ महाराष्ट्रच नव्हे तर मराठी माणूस जिथे जिथे आहे तेथे त्यांना छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज हे वंदनीय आणि आदरणीय आहेत. पण कोणतरी येतो आणि भावनेच्या भरामध्ये एखादे वक्तव्य करून जातो आणि त्यामुळे विनाकारण समाजात दुहीची आणि द्वेषाची निर्मिती केली जाते. महापुरुषांची विटंबना असो किंवा महापुरुषांबाबत केलेली आक्षेपार्ह विधाने असो यामुळे महाराष्ट्रातच नव्हे तर देशात अनेक ठिकाणी गंभीर स्वरूपाच्या दंगलीसुद्धा घडल्या आहेत आणि सामाजिक वातावरण बिघडून गेले आहे. याचा विचार करता महापुरुषांबाबत आक्षेपार्ह विधाने करणाऱ्यांना योग्य शिक्षा देण्याबाबत आता सरकारने गांभीर्याने पावले उचलायला हवीत. अर्थात, केवळ थेटपणे बोलणारे हे वाचाळवीरच नव्हे, तर या निमित्ताने सोशल मीडियावरसुद्धा जे एक सामाजिक युद्ध सुरु होते तेसुद्धा अत्यंत गंभीर स्वरूपाचे असते. अत्यंत खालच्या पातळीवर सोशल मीडियावर प्रतिक्रिया व्यक्त होत असतात. विनाकारणच एखाद्या समाजाबद्दल अविश्वासाची भावनासुद्धा निर्माण केली जात असते.

गेल्या काही दिवसांमध्ये महाराष्ट्रात वाचाळवीरांची डायलॉगबाजी दिवसेंदिवस जास्तच आक्षेपार्ह होत चालली आहे. त्यात आता समाजवादी पक्षाचे नेते अबू आझमी यांचीही भर पडली आहे. सोमवारी त्यांनी मुघल बादशाह औरंगजेब हा सर्वोत्कृष्ट प्रशासक होता आणि त्याच्या कारकिर्दीमध्ये सर्वकाही आलबेल होते अशा प्रकारचे विधान करून खळबळ माजवून दिली आहे. खरेतर आता 'छावा' चित्रपटाच्या निमित्ताने महाराष्ट्रात ज्या प्रकारची वातावरणनिर्मिती झाली आहे आणि छत्रपती संभाजी राजांच्या बलिदानानिमित्त राज्यात अनेक ठिकाणी बलिदान मास पाळला जात असताना संभाजीराजांवर अत्यंत क्रूर पद्धतीने अत्याचार करणार्या औरंगजेबाचे कोडकौतुक करणारे नेते महाराष्ट्रात आहेत ही खरोखरच गंभीर बाब मानावी लागेल. या पूर्वीसुद्धा छत्रपती संभाजीनगरमध्ये एमआयएमचे नेते ओवेसी यांच्या सभेमध्ये औरंगजेबाचे अशाच प्रकारे गुणगान करण्यात आले होते. संभाजीनगर येथील औरंगजेबाच्या कबरला भेट देऊन केवळ ओवेसी नाही तर इतर काही पक्षांच्या नेत्यांनीसुद्धा आश्चर्यकारक आणि आक्षेपार्ह असे वर्तन केले होते. ज्या महापुरुषांबद्दल आपल्या सर्वांच्या मनात आदराची भावना आहे त्याच महापुरुषांना गंभीर दुखापत करणारे औरंगजेबसारखे मुघल बादशहा आदर्श कसे असू शकतील, याचा विचार अबू आझमी यांच्या मनात आला कसा याचे आश्चर्य वाटते. दुसरीकडे विनाकारणच बोलण्याच्या भरात महापुरुषांचा अपमान करणारे वाचाळवीरही महाराष्ट्रात आहेत. राहुल सोलापूरकर किंवा प्रशांत कोरटकर यांनी गेल्या काही दिवसांमध्ये जी विधाने केली त्या विधानांची कोणत्याही प्रकारची गरज नव्हती. पण बोलण्याच्या भरामध्ये महापुरुषांचा अपमान करत आहोत याचे भान त्यांनाही राहिलेले नाही. मुळात गेल्या काही वर्षांमध्ये सर्वच महापुरूष आपापल्या जातीमध्ये दुर्दैवाने विभागले गेलेले आहेत आणि इतर जातीतील लोकांना या आपल्या महापुरुषांनाबद्दल आदर वाटत नाही अशा प्रकारची भावना निर्माण होत आहे किंवा जाणीवपूर्वक निर्माण करण्याचा प्रयत्नही होत आहे.

वाचाळवीरांच्या अशा प्रकारच्या आक्षेपार्ह विधानामुळे हा गैरसमज विनाकारणच वाढत जात असतो. काहीवेळा अज्ञानातूनसुद्धा महापुरुषांचा अवमान होऊ शकतो. पण त्यामागे कोणतीही तशा प्रकारची भावना नसते. साहजिकच सरकारला आता हा विषय गांभीर्याने घ्यावा लागणार आहे. कारण आगामी कालावधीमध्ये अशा प्रकारचे विषय सातत्याने समोर येणार आहेत. कोणीतरी एकाने केलेल्या चुकीच्या विधानाचा फटका संपूर्ण समाजाला बसण्याचा धोका लक्षात घेऊन अशा विषयाला पूर्णविराम देण्यासाठी किंवा असा विषय निर्माण करणार्यांना योग्य शासन देण्यासाठी एखादी वेगळी यंत्रणा उभारावीच लागणार आहे. जेव्हा असा एखादा विषय समोर येतो तेव्हा विविध राजकीय पक्षसुद्धा या विषयाचे गांभीर्य लक्षात न घेता क्रिया-प्रतिक्रियांचा खेळ खेळत बसतात आणि त्यातून तो विषय अधिकच पेटता राहण्याचे काम केले जाते.

साहजिकच अशा प्रकारच्या विषयांमध्ये कोणत्याही प्रकारचे राजकारण न आणता हे विधान कोणी केले आहे, त्याचा राजकीय पक्ष किंवा पार्श्वभूमी न पाहता त्याच्यावर कडक कारवाई करण्याशिवाय आता पर्याय राहिलेला नाही. केवळ प्रत्यक्षपणे विधाने करून सामाजिक वातावरण बिघडवणारे वाचाळवीरच नव्हे तर विनाकारण सोशल मीडियाच्या व्यासपीठावर आक्षेपार्ह मजकूर टाकून सामाजिक वातावरण बिघडवण्याच्या प्रक्रियेमध्ये भर घालणाऱ्या लोकांवरही कारवाई करण्याची गरज आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात आणि समाजकारणात आज कोणत्याही घटनेला जातीय संदर्भ देण्याची चुकीची सवय लागली असल्याने मूळ विषयाचे गांभीर्यसुद्धा मागे पडते आणि जातीय संदर्भ शोधले जातात. म्हणूनच आगामी कालावधीमध्ये सामाजिक वातावरण बिघडवणारे वाचाळवीर निर्माण होऊ नयेत म्हणून गेल्या काही कालावधीमध्ये ज्यांनी अशा प्रकारची चुकीचे विधाने केली आहेत त्या सर्वांवरच कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू करून सरकारने आपले धोरण स्पष्ट करायला हवे. अशा प्रकारच्या आक्षेपार्ह विधानामुळे त्या महापुरुषांचा अवमान होतोच शिवाय विनाकारण सामाजिक वातावरण बिघडते आणि अविश्वासाची भावना निर्माण होते हे जास्त गंभीर आहे.

# मास्टरमाईंड वाल्मीक कराड ते मंत्री धनंजय मुंडे राजीनामा; ८५ दिवसातील थरार..!

## सरपंच संतोष देशमुख हत्या व खंडणी प्रकरण



**बीड:मस्साजोगाचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या व खंडणी प्रकरणी आज जवळपास ८५ दिवस झाल्या नंतर मंत्री धनंजय मुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सांगण्यावरून आपला मंत्री पदाचा राजीनामा दिला. अर्थ संकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी त्यांना हा राजीनामा द्यावा लागला असून अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी रात्री या हत्या प्रकरणातील आरोपपत्रातील काही महत्वाचे फोटो हे व्हायरल झाले आणि राज्यात सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस यांनी मुंडे यांचा राजीनामा मागून घेतला.**

राज्यात विधान सभेच्या निवडणुका झाल्या नंतर बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या ही खंडणीच्या कारणाने झाली.या हत्येस मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मीक कराड हेच जबाबदार असल्याचे सीआयडी तसेच एसआयटीने केलेल्या तपासात निष्पन्न झाले, त्या नंतर वाल्मीक कराड यांचे आका हे मंत्री धनंजय मुंडे हे असून त्यांच्या राजीनाम्याची मागणी सरकारच्या पहिल्याचं हिवाळी अधिवेशना पासून करण्यात आली होती. परंतु ही मागणी सरकारच्या दुसऱ्या अधिवेशनात अर्थात अर्थ संकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी पूर्ण होण्यास मुहूर्त मिळाला. राज्याच्या मंत्री मंडळ विस्तारात धनंजय मुंडे यांना मंत्री पदाची दुसऱ्यांदा संधी मिळाली. मात्र शपथविधी पासूनच मंत्री मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी होहू लागली. तीन महिन्या मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी सत्ताधारी आमदारांसह विरोधक तसेच स्वपक्षीय करत होते. राजीनामा होत नाही हे लक्षात येताच विरोधकांनी सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ राज्यात आक्रोश मोर्चे काढले शिवाय सुरुवातीस हत्या झाल्यावर या हत्याकांडातील मुख्य आरोपी वाल्मिक कराड याला पोलीसा मदत करत असल्याचे आरोप देखील मोठ्या प्रमाणावर करण्यात आले. त्यामुळे या हत्याकांडाची राष्ट्रीय स्तरावर चर्चा झाली, देशाचे गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे बीडचे खासदार बजरंग सोनावणे, खा. सुप्रिया सुळे यांनी भेट घेवून या हत्या व खंडणी प्रकरणाच्या चौकशीचे आदेश देवून आरोपींना अटक करून फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी केली. त्यानंतर गृहमंत्री अमित शहा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे हा विषय देऊन प्राधान्याने सोडवाव असे सांगितले. धनंजय मुंडे हे राज्याच्या मंत्री मंडळात असल्याने या आरोपींना सरकारचे संरक्षण मिळाल्याची भावना विरोधाकासह भाजपच्या आमदारांनी केली त्यामुळे या हत्याकांडाची सर्वत्र मोठ्या प्रमाणावर चर्चा होहू लागली. या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराड यांच्या बद्दल सर्वत्र चर्चा होऊ लागली त्यामुळे कराडला पोलिसांना शरण यावेच लागले. जवळपास तीन आठवड्या नंतर या हत्याकांडाचा मास्टरमाईंड वाल्मिक कराड हा पोलिसांना शरण आला. वाल्मिक कराड शरण येताच या प्रकारांची सीआयडी, एसआयटी चौकशी करण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात जाहीर करून वरिष्ठ पोलीस संचालक पदाच्या अधिकाऱ्या मार्फत याची चौकशी सुरु केली. परंतु विरोधकांचे समाधान न झाल्याने न्यायालयीन चौकशीची केलेली मागणी देखील त्यांनी मान्य करून हि चौकशी समिती गठीत करण्याचे आदेश दिले. दरम्यान मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेल्या तिन्ही चौकशी समिती वर विरोधकांनी समाधान व्यक्त केले खरे मात्र मंत्री धनंजय मुंडे यांचे आणि या हत्याकांडातील मुख्य आरोपी असलेला वाल्मिक कराड यांचे अत्यंत घनिष्ट संबंध आहेत तसेच ते अनेक कंपनी मध्ये भागीदार देखील आहेत त्यामुळे मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्यावा तरच या हत्याकांडाची निपक्षपातीपणे चौकशी होईल अशी मागणी देखील वेळोवेळी केली. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हत्याकांडातील एकही आरोपीला सोडले जाणार नाही मग तो किती हि मोठा असला तरी , परंतु राजीनाम्या बाबत उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रावादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांच्या कोर्टात मुंडे यांच्या राजीनाम्यावर त्यांनी भाष्य केले. त्यावर पवार यांनी मुंडे यांच्या विरुद्ध कुठलाही पुरावा नाही त्यांचा या घटनेशी संबंध नाही असे सांगून राजीनामा घेणार नाही असे ठणकावून माध्यमांना सांगितले. मंत्री धनंजय मुंडे यांनी देखील यावर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले तरआपण लगेच राजीनामा देवू असे जाहीर केले होते. या आरोप प्रत्यारोपाच्या फैरीत सीआयडी तसेच एसआयटीने जवळपास १४०० पानाचे चार्ज शीट तयार करून ते केज येथील मकोका न्यायालयात सादर केले. या चार्जशीट मध्ये हत्याकांड आणि खंडणीतील मुख्य आरोपी हा वाल्मिक कराड हाच असून तपासा दरम्यान जवळपास १५ पेक्षा जास्त मोबाईल जप्त करण्यात आले असून या मोबाईल मध्ये हत्या करण्या पूर्वी तसेच झाल्यावर काही वीडीओ तसेच सेल्फी घेतल्याचे आढळून आले आहेत . हे फोटो, व्हिडीओ एवढे संवेदनशील आहेत कि ते बघताना पोटात गोळा येतो. एवढेच नाही तर मृत्यू नंतर सरपंच संतोष देशमुख यांच्या मृतदेहावर मारेकऱ्यांनी चक्क लघवी करतानाचे फोटो असून हे पुरावे तापस यंत्रणेला मिळाले आहेत. चार्जशीट मधील फोटो, व्हिडीओ हे काल माध्यमांवर व्हायरल झाले त्यामुळे किती निघृणपणे सरपंच देशमुख यांची हत्या करण्यात आली हे सर्वांसमोर आले,त्यामुळेच लोकांच्या भावनेचा उद्रेक झाला. जिल्ह्यासह राज्यात सर्वत्र या हत्याकांड बद्दल बोलल्या जावू लागले आणि मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी वाढू लागली. काल मध्यरात्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ,उपमुख्यमंत्री अजित पवार , यांच्यासह राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांची बैठक झाली. या बैठकीत धनंजय मुंडे यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा असे त्यांना सांगण्यात आले. अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असल्याने अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विरोधकांसह स्वपक्षीयांनी राजीनाम्याची मागणी लावून धरल्याने अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी सकाळी मंत्री धनंजय मुंडे यांना आपल्या पदाचा राजीनामा मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे सोपवला आणि तो मुख्यमंत्री फडणवीस यांनी मान्य करून पुढील कारवाई साठी राज्यपाल यांच्याकडे पाठवले असल्याचे जाहीर केले. संतोष देशमुख हत्या व खंडणी प्रकरणा वरून मंत्री मुंडे यांना पायउतार व्हावेच लागले एवढेच नाही तर मीडिया ट्रायला सामोरे ही जावे लागले. यातूनच आता या हत्या व खंडणी प्रकरणाची पहिली तारीख हि १२ मार्च रोजी असून राज्य शासनाने या खटल्यासाठी विशेष सरकारी वकील म्हणून ॲड.उज्वल निकम यांची नियुक्ती केली आहे. तर सहाय्यक सरकारी वकील म्हणून ॲड. बाळासाहेब कोल्हे हे सुरुवाती पासून काम पाहत आहेत. दरम्यान निकम हे पहिल्या सुनावणी पासून उपस्थित राहणार आहेत. हत्येचे गांभीर्य लक्षात घेऊन ते देशमुख कुटुंबीयांची देखील भेट घेऊ सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशीची पर्यंत घेऊन जाणार असा विश्वास व्यक्त करून देणार आहेत.



## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.३ मार्च २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १५२.५० क्विंटल | २,५५१ | ३,२०० | २,८३२ |
| ज्वारी/हायब्रिड: १८२.५० क्विंटल | १,७०० | ३,८५१ | २,४९१ |
| मका/लोकल:२०.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर :२४.०० क्विंटल | ७,००० | ७,२३१ | ७,१५२ |
| उडीद : ७.५० क्विंटल | ५,१०० | ५,१०० | ५,१०० |
| बाजरी: ७.०० क्विंटल | २,८०० | ३,२०२ | २,९६६ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: २७६.०० क्विंटल | २,९९१ | ४,०५० | ३,९०३ |
| हरभरा: ४०.५० क्विंटल | ५,२०० | ५,२३२ | ५,२०५ |

# मुंडेंनी तेव्हाच नैतिकता दाखवायला पाहिजे होती-खा.बजरंग सोनवणे

केज । प्रतिनिधी

**संतोष देशमुख यांची क्रुरपणे हत्या करण्यात आली. त्याचवेळी त्यांना मारहाण केलेला एक फोटो समाज माध्यमांमध्ये व्हायरल झाला होता. तेव्हाच मारहाणीच्या खुणा पाहून धनंजय मुंडेंनी नैतिकता दाखवायला पाहिजे होती. आता राजीनामा देण्यास प्रचंड उशीर केला आहे. दरम्यान, या प्रकरणात आरोपींना मदत करणारे व देशमुख कुटुंबियांची दिशाभूल करणा-या पोलीसांना देखील खुनाच्या गुन्ह्यात आरोपी करावे, अशा शब्दात खा.बजरंग सोनवणे यांनी तोफ डागली.**

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्यावर मारेकऱ्यांनी केलेल्या अत्याचाराचे आणि छळाचे फोटो दि.३ मार्च रोजी रात्री उशीरा प्रसिद्धी माध्यमावर व्हायरल झाले. यानंतर राज्यभरातून संताप दिसू लागलेला आहे. दि.४ मार्च रोजी सकाळी खा.बजरंग सोनवणे यांनी मस्साजोग येथे जावून संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली आणि धनंजय देशमुख यांचे सांत्वन केले. पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, या




हत्याकांडातील सर्व आरोपींना कठोरात कठोर अशी फाशीची शिक्षा व्हायला पाहिजे. त्याच बरोबर त्यांना गाड्या, पैसा आणि इतर मदत करण्यामागे जे कोणी असतील त्यांना देखील शिक्षा व्हायला हवी. संतोष देशमुख यांचा छळ करून जीवे मारल्याची सर्व पुरावे व फोटो उपलब्ध असताना देखील सरकारने तीन महिने धनजंय मुंडेंना वाचविले. त्यावेळी देखील मारहाणीचा एक फोटो व्हायरल झाला होता. त्याचवेळी नैतिकता दाखवून धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यायला पाहीजे होता. देशमुख हत्येच्या कटात कांही पोलीस सुद्धा सहभागी असून आतापर्यंत पोलिसांनी या बाबत एकही पत्रकार परिषद का घेतली नाही? वाल्मीक कराडला अटकेत असताना एवढ्या सुविधा कशा पुरविल्या जातात ? जमावबंदी असताना वाल्मीक कराड याच्या समर्थनासाठी पोलीस ठाण्याच्या दारात शेकडोंच्या संख्येत प्रतिमोर्चे कसे निघतात? खंडणीचे व ॲट्रॉसिटीचे गुन्हे दाखल करू नका म्हणून पोलीस निरीक्षक प्रशांत महाजनला कुणा कुणाचे फोन आले? धनंजय मुंडे यांनी फोटो पाहून व्यथीत होऊन आणि वैद्यकिय कारणाने राजीनामा दिला? त्या कारणांपैकी नेमके कोणते कारण आहे, हे मात्र त्यांनाच माहीत, असा टोला देखील त्यांनी लगावला.

> ### “ प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात अंडर ट्रायल चालवा
>
> संतोष देशमुख हत्या प्रकरण हे फास्ट ट्रॅक कोर्टात आणि अंडर ट्रायल चालवायला हवे.संतोष देशमुख यांचे अपहरण झाल्यानंतर गावकरी त्यांचा शोध घेत असताना पोलिसांनी त्यांची दिशाभूल करण्यासाठी खोटी माहिती दिली. कारण लोक त्या दिशेने जावेत आणि संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना त्यांचा उद्देश साध्य करता यावा, असा तर पोलीसांचा उद्देश नसेल. तसेच मारेकरी हे धाराशिव जिल्ह्यातील वाशी येथील जंगलात पळून गेल्याची खोटी माहिती पोलीसांनीच सांगितली, असा उल्लेख त्यांनी केला.हे सर्व प्रकरण अमानवी व गंभीर आहे, त्यामुळे राष्ट्रीय मानवाधिकार आयोग या प्रकरणात कठोर कारवाई करेल असा विश्वास खा. सोनवणे यांनी व्यक्त केला.

## विधानसभा विरोधी पक्षनेतेपदासाठी शिवसेनेचे भास्कर जाधव यांचे नाव निश्चित

मुंबई । प्रतिनिधी

**शिवसेना नेते, आमदार भास्कर जाधव यांची विधानसभेच्या विरोधी पक्ष नेतेपदी नियुक्ती करण्यात यावी, या मागणीचे पत्र मंगळवारी (दि. ४) शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना देण्यात आले.**



महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या बैठकीत विरोधी पक्षनेते पदासाठी भास्कर जाधव यांचे नाव निश्चित करण्यात आले. तत्पूर्वी विधानसभा विरोधी पक्षनेतेपदाबाबत ठाकरेंच्या शिवसेनेत आणि राष्ट्रवादीत वाटाघाटी झाल्याचे सूत्रांकडून समजते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने अडीच वर्ष विरोधी पक्षनेतेपद देण्याची मागणी केली आहे. तर काँग्रेसने ५ वर्षांसाठी विधान परिषदेच्या विरोधी पक्षनेतेपदावर दावा केला आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनामध्ये अडीच - अडीच वर्षांचा फार्मुला ठरण्याची शक्यता आहे. या बैठकीला माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष तथा आमदार जयंत पाटील, आमदार जितेंद्र आव्हाड, माजी मंत्री आमदार आदित्य ठाकरे आदी नेते उपस्थित होते.

## पान १ वरून...

### धनंजय मुंडेंच्या जागी

असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. अजित पवारांच्या पक्षातील चार नेत्यांची नावे मंत्रिमंडळात स्थान मिळण्यासाठी आघाडीवर आहेत. यामध्ये छगन भुजबळ यांचे नाव चर्चेत आहे. छगन भुजबळ यांची पुन्हा मंत्रिमंडळात एंन्ट्री होण्याची शक्यता असून मुंडे यांच्या राजीनाम्यामुळे भुजबळ यांच्या पुन्हा मंत्री होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. छगन भुजबळांबरोबरच अजित पवारांच्या पक्षातील अनिल पाटील यांचे नावही धनंजय मुंडेंची रिप्लेसमेंट म्हणून चर्चेत आहे. तसेच माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके, आमदार संजय बनसोडे याचीं नावे देखील चर्चेत असल्याची माहिती मिळत आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात प्राथमिक चर्चा झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

----------

### हडप केलेली जमीन

देशाच्या पहिल्या महिला राष्ट्रपती असलेल्या प्रतिभाताई पाटील यांना देखील जयकुमार रावल आणि त्यांच्या कुटुंबीयांनी सोडले नाही. तर इतर गरीब कुटुंबीयांचे काय? असा सवालही गोटे यांनी उपस्थित केला आहे. जयकुमार रावल धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा विधानसभा मतदारसंघाचे आमदार आहेत. तसेच राज्याच्या पणन आणि राज शिष्टाचार खात्याची त्यांच्यावर जबाबदारी आहे. रावल यांची आमदारकीची सहावी टर्म असून मुख्यमंत्री फडणवीसांच्या पहिल्या मंत्रिमंडळात रावल यांच्याकडे कॅबिनेट पद होते. तर सध्या ते राज्याचे विद्यमान पणन आणि राजशिष्टाचार मंत्री आहेत.

--------------

### आरोपींना आमच्या

यावेळी संपुर्ण बाजारपेठ बंद झाली. शाळा, महाविद्यालये सोडून देण्यात आली. दरम्यान, केजमध्ये उपममुख्यमंत्री अजित पवार, माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या छायाचित्रांचे बॅनर आणि टायर जाळून निषेधाच्या घोषणा दिल्या गेल्या. केज व बीडमध्ये या घटनेतील आरोपी वाल्मीक कराड, विष्णू चाटे, जयराम चाटे, सुदर्शन घुले, प्रतिक घुले, सुदर्शन सांगळे यांचे फोटो मुत्रालयांत लावण्यात आले. त्यावर लघू शंका करुनही या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी आरोपींचे समर्थन करणाऱ्यांनो डोळे उघडून बघा, अशा संतप्त प्रतिक्रिया सोशल मिडीयावर उमटल्या गेल्या. मंगळवारी सकाळी मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील मस्साजोगला दाखल झाले. त्यांनी देशमुख कुटूंबियांची भेट घेत धीर दिला.

-------------

### महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य

विचारणेसंदर्भात दोन्ही बाजू न्यायालयाला समाधानकारक उत्तर देऊ शकल्या नाहीत. दोन्ही बाजूंची भूमिका होती की, आम्हाला निवडणुका पाहिजेत. मात्र, त्यात काहीसा गोंधळ होता. त्यावर न्यायालयाने संताप व्यक्त केला आणि या संदर्भातील सर्व कागदपत्रे मागवली. हे प्रकरण आता पुढच्या सुनावणीत ऐकले जाईल. त्यामुळे हे प्रकरण पुन्हा एकदा लांबणीवर पडले आहे. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाला होळीच्या निमित्ताने ९ मार्च ते १६ मार्च दरम्यान सुट्ट्या आहेत.

**ओबीसी आरक्षण हे प्रकरण न्यायप्रविष्ट**

विधानसभा निवडणुकीनंतर सर्वच राजकीय पक्षांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वेध लागले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि त्यामध्ये ओबीसी आरक्षण हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. सर्वोच्च न्यायालयासमोर हे प्रकरण प्रलंबित असल्यामुळे राज्यात अनेक ठिकाणी चार- चार वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्या नाही. देशात लोकसभेपाठोपाठ राज्यात विधानसभा निवडणूक झाली. त्यानंतर राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होतील, यावर सर्वत्र चर्चा सुरू आहे.

------------

### ओबीसींवरील अत्याचारावेळी

केला. जालना जिल्ह्यातील भोकरदनमध्ये एका धनगर समाजाच्या कैलास बोऱ्हाडे यांच्यावर झालेल्या अमानुष अत्याचाराच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर बोलत होते. या घटनेतील दोषींवर तत्काळ अटक करून कठोर कारवाई करण्याची मागणी आंबेडकर यांनी केली आहे. ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे की, छगन भुजबळ, नवनाथ पडळकर, लक्ष्मण हाके, पंकजा मुंडे हे स्वतःला ओबीसींचे नेतृत्व करणारे म्हणवतात. मात्र, ओबीसी समाजावर अन्याय होत असताना हे कुठे असतात? जालना येथील या गंभीर घटनेकडे या नेत्यांनी अजूनही गांभीर्याने पाहिलेले नाही, ही बाब दुर्दैवी आहे. ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी पुढे म्हटले आहे की, ''वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी त्या गावाला भेट दिली असून, पोलिसांकडे कारवाईची मागणी केली आहे. मात्र, केवळ एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. मी स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वेळ मागितली असून, लवकरात लवकर कठोर कारवाई व्हावी, अशी आमची मागणी आहे. पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले की, या संदर्भात जालना जिल्ह्यातील ओबीसी संघटनांशी चर्चा झाली असून, त्यांनी ६ तारखेला मोर्चा आयोजित केला आहे. शासनाने तातडीने दोषींना अटक करावी, तसेच गावकऱ्यांनी ही अमानुष घटना उघड्या डोळ्यांनी पाहिली आहे, तर त्या गावावर सामूहिक दंड बसवावा, अशी मागणीही यावेळी केली. शेवटी बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले की, तसेच तुम्ही जे पेरता, तेच उगवते. धार्मिक द्वेष पसरवल्याने राज्यातील सामाजिक सलोखा बिघडत आहे, अशी खंतही यावेळी व्यक्त केली.

------------

### कोरटकर, सोलापूरकर यांच्या विरोधात

त्याने शिवाजी महाराजांच्या बाबत वक्तव्य केले आहे. सत्ताधारी पक्षातील आमदारांनी अबू आझमी यांच्या विरोधात भूमिका घेतली असली तरीही त्याचीच पिलावळ प्रशांत कोरटकर आणि राहुल सोलापूरकर यांच्याविरोधात काहीही भूमिका घेतली नसल्याची जोरदार टीका अंबादास दानवे यांनी केली. राहुल सोलापूरकर याने आमची अस्मिता छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास विकृत पद्धतीने मांडला आहे. विकृत मानसिकता असलेल्या या गुन्हेगारावर कारवाई करण्याच्या ऐवजी पुणे महानगरपालिकेच्या वतीने सांस्कृतिक धोरण ठरवणाऱ्या सल्लागार समितीत घेऊन त्याचा सन्मान करण्यात आला आहे. सदरील प्रकरण लक्षात घेता शासनच राहुल सोलापूरकर आणि प्रशांत कोरटकर यांना पाठीशी घालत असल्याचे दिसून येत असल्याचे दानवे म्हणाले.

------------

## बालकीर्तनकार सोहम सातपुते यांचा आज होणार गौरव



**बीड । प्रतिनिधी**

अखिल प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने विविध क्षेत्रातील उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींचा गुणगौरव सोहळा शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे बुधवार ५ मार्च रोजी दुपारी ३ वाजता होणार आहे. यावेळी मान्यवरांच्या हस्ते बालकीर्तनकार सोहम सातपुते यांचा गौरव होणार आहे.

बालकीर्तनकार सोहम सातपुते यांनी आपल्या वाणीतून समाज प्रबोधन करण्याचे काम बाल वयात सुरू केले असून त्यांची दूरवर ख्याती पसरलेली आहे. बाल वयात त्यांच्या कीर्तनासाठी पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत. समाज प्रबोधनाचे काम करणारे सोहम सातपुते यांचा आज बुधवार ५ मार्च रोजी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात, उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी, अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे राज्य अध्यक्ष देविदास बसोदे यांच्या हस्ते पुरस्कार देवून सन्मान करण्यात येणार आहे.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार, दि. ५ मार्च २०२५



# नीता अंधारे यांनी पदभार घेतला अन् नगर पालिकेची भंगार पालिका झाली

## मुख्याधिकारी बीड यांची त्वरित बदली करण्याची वंचीतची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

**बीड नगरपालिके अंतर्गत राहणाऱ्या सर्व नागरिकांना मूलभूत सुविधांपासून वंचित ठेवत आहे. मुख्याधिकारी नीता अंधारे यांचे नगरपालिकेतील कर्मचारी अधिकारी यांच्यावर कसल्याही प्रकारचे नियंत्रण नाही त्यामुळे बीड मधील नागरिकांना विविध समस्येचा सामना करावा लागत आहे.**

२०० ते २५० कोटी रुपये खर्च करून पाणीपुरवठा योजना बीड शहरामध्ये राबवली आहे परंतु आजही बीड शहराला २० दिवसाला पाणीपुरवठा होत आहे. धरण उशाला अन कोरड घशाला अशी अवस्था बीडकरांची झाली आहे. पाणीपुरवठा कमी आणि त्यावर खर्च जास्त केला जात आहे याप्रकरणी ही चौकशी होणे महत्त्वाचे आहे तसेच बीड शहरातील नागरिकांनी पाणीपुरवठा कर भरू नये असे आवाहन वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात येत आहे.

स्वच्छतेच्या बाबतीमध्ये बीड शहरामध्ये गल्लोगल्ली घंटागाडी फिरत होती ती आता बंद झाली आहे तसेच कचरा टाकण्याच्या स्पॉटवर कचराकुंडी ठेवण्यात आलेल्या होत्या परंतु त्याही नगरपालिकेने काढले आहे यामुळे रस्त्यावर घाणीची साम्राज्य पसरले आहे. बंद केलेल्या घंटागाडी सुरू करून मोक्याच्या ठिकाणी कचराकुंडी यांची उभारणी तात्काळ करण्यात यावी व स्वच्छतेच्या नावाखाली कोट्यवधी रुपयाचा निधी खर्च केल्याचे दाखवत बोगस बिले उचलली जात आहेत.

बीड शहरामध्ये प्लास्टिक पिशव्यांचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात वाढले आहे काही दुकानदार व्यापारी ही प्लास्टिक पिशव्यांचा सर्रास वापर करताना दिसून येत आहेत नगरपालिकेने नेमलेले अधिकारी धाड टाकण्याचे काम करतात परंतु आर्थिक व्यवहार करत कारवाई करत नाहीत त्यामुळे प्लास्टिकचे प्रमाण कमी होण्याऐवजी वाढत चालले आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी व मुख्याधिकारी नीता अंधारे यांचे अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कसलेही नियंत्रण नसल्याने सदरील प्रकार निदर्शनास येत आहेत. तसेच नगरपालिकेतील अधिकारी-कर्मचारी हे स्वतःहून प्लास्टिक जाळत वायू प्रदूषण करत असल्याचे दिसून येत आहेत.

बीड शहरात दोन चाकी वाहनावर, पायी चालणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना व रस्त्याच्या कडेला असणारे रहिवाशांना धुळीचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. मोठी वाहने रस्त्यावरून जात असताना त्याचे धुलीकण डोळ्यांमध्ये जाऊन डोळ्यांचे विकार व श्वसनाचे आजार जडत आहेत. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी कर्मचारी बीडमध्ये तपासणीसाठी येत नसल्यामुळे व मुख्याधिकारी नीता अंधारे यांच्या आळसटलेल्या भूमिकेमुळे बीडकरांना अशा समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

यासारख्या असंख्य बाबी समोर येत असून मुख्याधिकारी नीता अंधारे यांच्याकडे नगरपालिकेचा पदभार आल्यापासून बीडकरांचे हाल चालले आहेत. नगरपालिके अंतर्गत मिळणाऱ्या सुखसुविधीपासून वंचित ठेवण्याचे काम मुख्याधिकारी निता अंधारे या करत आहेत तसेच बीड नगरपालिका अंतर्गत विकास कमी आणि खर्च जास्त दाखवत कामे केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे.

आयुक्त तथा संचालक नगर परिषद प्रशासन वरळी मुंबई यांच्याकडे जिल्हाधिकारी बीड यांच्यामार्फत बदली करण्याची मागणी करण्याचे निवेदन देण्यात आले यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, जिल्हा महासचिव खंडू देवराव जाधव, जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर कवठेकर पुरुषोत्तम वीर, सहसंघटक अर्जुन जवंजाळ, तालुका अध्यक्ष किरण वाघमारे, मिलिंद सरपते, यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.



**चौसाळा: सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्याचे फ़ोटो व्हायरल झाल्यानंतर संतापाची लाट उसळली आहे. याचा निषेध म्हणून मंगळवारी जिल्हा बंदचे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार चौसाळा येथे कडकडीत बंद पाळण्यात आला. (छाया : एन.टी.वाघमारे)**

## भगवान महाराज विद्यालयात दहावी उन्हाळी वर्गाचे उद्घाटन उत्साहात



### विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यास करून जीवनात यशस्वी व्हावे -प्राचार्य बी.टी. खाडे

**पाटोदा । प्रतिनिधी**

भगवान महाराज विद्यालय सावरगाव घाट ता. पाटोदा जि. बीड येथे इयत्ता दहावीच्या उन्हाळी विशेष वर्गांचे उद्घाटन १ मार्च पासून मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य श्री.बी.टी. खाडे सर यांच्या हस्ते करण्यात आले.


उद्घाटन सोहळ्यात प्रमुख पाहुण्यांनी व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत उन्हाळी वर्गांच्या महत्त्वावर प्रकाश टाकला. त्यांनी विद्यार्थ्यांना नियमित अभ्यास करण्याचा सल्ला दिला आणि या उपक्रमाचा परीक्षेच्या तयारीसाठी उपयोग कसा करून घ्यावा, याबाबत माहिती दिली. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांनीही या वर्गांमध्ये मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. त्यांची शिकण्याची उत्सुकता आणि सकारात्मक दृष्टिकोन पाहून शिक्षकांनी आनंद व्यक्त केला.

कार्यक्रमास शिक्षकवृंद, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चार वर्षांपूर्वीच्या खुनातील फरार दोन आरोपी जेरबंद, दुचाकी चोरट्यालाही केले गजाआड; स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

दि. ४ वर्षांपूर्वी झालेल्या खुनातील दोन फरार आरोपी तसेच अंबाजोगाई, बीड आणि लातूर जिल्ह्यातील १९ मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यात फरार असलेला आरोपी परळी येथे असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली. त्यानंतर पोलिसांनी सापळा रचून या तिघांना ४ मार्च रोजी सकाळी अटक केली. त्यांना अंबाजोगाई शहर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.



३१ ऑगस्ट २०२१ रोजी दिलीप अभिमान धोत्रे (रा. अंबाजोगाई) यांनी शहर पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत नमूद केले होते की, ''डुक्कर का मारले?'' या कारणावरून अंबाजोगाईतील ११ आरोपींनी त्यांचा भाऊ रवी अभिमान धोत्रे याचा खंजीर व चाकूने भोसकून खून केला होता. या प्रकरणातील काही आरोपी फरार झाले होते. स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे परळी येथे सापळा रचण्यात आला आणि खुनातील दोन आरोपी तेजसिंग उर्फ तेजेश शेरसिंग गोके (वय ३५) व पुनमसिंग तारासिंग टाक (वय ४०), दोघेही रा. अंबाजोगाई, तसेच १९ दुचाकी चोरीच्या गुन्ह्यात फरार असलेला रोशनसिंग यशपालसिंग उर्फ रिशपालसिंग टाक (वय २०), रा. अंबाजोगाई यांना पोलिसांनी ताब्यात घेतले.ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, पोलीस निरीक्षक (स्थानिक गुन्हे शाखा) उस्मान शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुशांत, पोलीस हवालदार मारोती कांबळे, विकास राठोड, बाळकृष्ण जायभाये, विष्णू सानप, राजू पठाण, मनोज जोगदंड, पोलीस अंमलदार बप्पासाहेब घोडके, चालक नितीन वडमारे आणि गणेश मराडे यांनी केली.

## महाविद्यालय अनुपस्थिती सर्वेक्षणाचा प्रशिक्षण वर्ग संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेची प्रदेश कार्यकारणीची बैठक नुकतीच नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद येथे पार पडली. या बैठकीमध्ये महाविद्यालयांमधील वाढत जाणाऱ्या अनुपस्थितीचे सर्वेक्षण करण्याचा निर्णय प्रदेश कार्यकरीणीने पारित केला. याच अनुषंगाने बीड येथील सोनाजीराव शिरसागर महाविद्यालयांमध्ये दिनांक ३ मार्च रोजी प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले या प्रशिक्षणाला छत्रपती संभाजीनगर, जालना ,बीड, धाराशिव या जिल्ह्यातून कार्यकर्ते उपस्थित होते.

याच अनुषंगाने अभाविप देवगिरी प्रदेशाच्या वतीने महाविद्यालय अनुपस्थिती सर्वेक्षण ५ ते १५ मार्च या कालावधीमध्ये करण्यात येईल. हे सर्वेक्षण शैक्षणिक क्षेत्रातील प्रमुख ६ घटकांसाठी करण्यात येणार आहे. यामध्ये विद्यार्थी, प्राध्यापक, प्राचार्य,पालक ,संस्थाचालक, विद्यापीठ अधिकारी यांचा समावेश असेल. देवगिरी प्रदेशात येणाऱ्या ११ जिल्हे व प्रमुख ५ विद्यापीठांपैकी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ. संभाजीनगर परिक्षेत्रातील कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण बीड येथील सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक महाविद्यालयात सोमवारी दि. ०३ मार्च रोजी पार पडले. या प्रशिक्षण वर्गामध्ये छ.संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव या जिल्ह्यातील कार्यकर्ते उपस्थित होते. या प्रशिक्षण वर्गामध्ये अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे देवगिरी प्रदेश अध्यक्ष प्रा.डॉ. सचिन कंदले, प्रदेश मंत्री कु. वैभवी ढिवरे, प्रदेश संघटन मंत्री सिद्धेश्वर लटपटे, प्रदेश सहमंत्री ऋषिकेश केकान, सर्वेक्षण प्रांत प्रमुख स्वप्नील बगाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन नंदिनी रुईकर यांनी तर संध्या बेहरे, राघवेंद्र कुलकर्णी, आशिष वारे, अजय शिंदे, तुषार घुले, सार्थक कडू आदी कार्यकर्त्यांनी कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.



## जनमित्र हा महावितरणाचा कणा आहे -संदीप चाटे

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

''जनमित्र कर्मचाऱ्यांना विरंगुळा मिळावा म्हणून संगीत रजनी व सुरूची भोजनाचे आयोजन''

०४ मार्च हा 'लाईनमन डे' म्हणून साजरा केला जातो,याच 'लाईनमन डे' चे औचित्य साधून सर्व जणमित्रांना कर्मचाऱ्यांना विरंगुळा मिळावा म्हणून संदीप चाटे साहेब यांच्या संकल्पनेतून महावितरण अधिकाऱ्यांच्या वतीने संगीत रजनी व सुरुची भोजनाचे आयोजन अंबाजोगाई येथील मानवलोक अ‍ॅड भगवानदासजी लोहिया कल्याण मंडपम्? या प्रशस्त परिसरात आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी अंबाजोगाई महावितरण विभागाचे कार्यकारी अभियंता श्री संदीप चाटे साहेब हे होते, तसेच कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्री बोबडे साहेब, श्री कानडे साहेब, श्री दत्ताभाऊ गुट्टे साहेब, श्री गीते सर, श्री जाधव सर ,कराड सर, नाकाडे सर ,आमले सर, मुंडे सर ,महिला प्रतिनिधी सहाय्यक अभियंता श्री नागरगोजे मॅडम, लेखा विभागाचे काळे सर ,किशोर ढगेसर ,देशमुख मॅडम व इतर अधिकारी कर्मचारी लाईनमन डे कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व इतनी शक्ती हमे दे ना दाता या प्रार्थनेने झाली. नंतर प्रत्येक शाखेतील प्रत्येक कर्मचारी जनमित्र यांचा पुष्पगुच्छ व शुभेच्छापत्र देऊन सत्कार करण्यात आला.

'सुरक्षा विषयक शपथ' सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांनी घेतली. कार्यक्रमाच्या वेळी विरंगुळा म्हणून नारायण चाटे संगीत रजनी प्रस्तुत यांच्यावतीने गीत गायन मनोरंजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमात जनमित्र श्री सुनील दहिफळे, अर्जुन राव मुंडे, अशोक मुंडे इतर कर्मचाऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषण श्री संदीप चाटे सर यांनी केले आपल्या भाषणात महावितरणाची कर्तव्यरूपी सेवा करत असताना येथे चुकीला माफी नाही त्यामुळे काळजीपूर्वक आपण लाईट संदर्भात काम करणे आवश्यक आहे, तसेच काळजी घेणे फार आवश्यक आहे, जनमित्र हा महावितरण चा कणा आहे त्यामुळे तुमच्यावर फार मोठी जिम्मेदारी ती तुम्ही काळजीपूर्वक पार पाडणे आवश्यक आहे याचे भान आपण ठेवले पाहिजे.जणमित्र यांनी विद्युत वाहिनीवर काम करताना एकदा आपल्या कुटुंबाची आठवण काढूनच काम करावे म्हणजे आपण काळजीपूर्वक काम कराल अशी अपेक्षा चाटे सर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात व्यक्त केली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किशोर फड यांनी केले तर आभार लेखा विभाग अधिकारी काळे सर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी अधिकारी सर्वश्री बोबडे सर, कानडे सर, गीते सर, काळे सर, जाधव सर ,कराड सर, श्री डेंगे व इतर अधिकारी कर्मचारी यांनी परिश्रम घेतले व कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला कार्यक्रमाला महिला कर्मचारी वर्गाची उपस्थिती आवर्जून होती.



पान ६ वरून...

## तट बोरगाव येथे हरभरा

ऊस पिकामधील कीड रोग अन्नद्रव्य विकृतीचे एकात्मिक व्यवस्थापन. ऊस पिकामध्ये वाढत्या तापमानाचा ताण पडत असेल तर १३ : ०० : ४५ हे विद्राव्य खत ५ ग्रॅम, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट चे मल्टीमायक्रोन्यूट्रिएंट २ मिली व वसंत ऊर्जा ५ मिली प्रति १ लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी.

* ऊस पिकामध्ये सद्यस्थितीत निर्दशनास येत असलेल्या ऊसावरील पोंगेमर व लोकरी माव्याच्या एकत्रित व्यवस्थापनासाठी क्लोरपायरीफॉस (२० टक्के प्रवाही) २० मिली प्रति किंवा सायपरमेथ्रीन (१० टक्के प्रवाही) १५ मिली किंवा फिप्रोनिल (५ टक्के एस.सी.) २० मिली प्रति १० लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. लोकरी मावा पानांच्या खाली असल्याने व त्यावर लोकरीसारखे आवरण असल्याकारणाने कीटकनाशकाचे द्रावण किडी पर्यंत व्यवस्थित पोहोचण्यासाठी द्रावणास चिकटपणा येण्यासाठी उत्तम दर्जाचे स्टिकर १ मि.ली प्रति लिटर द्रावणामध्ये मिसळावे तसेच फवारणी करताना फवारणीचे द्रावण पानांच्या खालच्या बाजूने जाईल अशा पद्धतीने फवारणी करावी. * ऊस पिकामधील चाबुक काणी व्यवस्थापनासाठी प्रादुर्भावग्रस्त ऊसाचे बेट मुळासकट उपटून प्लास्टिकच्या पिशवीमध्ये घेऊन नष्ट करावे हे करत असताना काळी पावडर इतर ऊसावर किंवा शेतामध्ये पडणार नाही याची काळजी घ्यावी. काणी रोगाच्या प्रादुर्भाव व्यवस्थापनासाठी अ‍ॅझॉक्सीस्ट्रॉबीन १८.२ टक्के अधिक डायफेनोकोनाझोल ११.४ टक्के एससी या संयुक्त बुरशीनाशकाची १० मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी.शिवप्रसाद रामप्रसाद येळकर, ऊस विकास अधिकारी, नॅचरल शुगर, रांजणी.

# शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसह अन्य आश्वासनांची अंमलबजावणी करा -खा. काळे

**जालना । प्रतिनीधी**

विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासह अन्य आश्वासनांची पूर्तता तात्काळ करावी तसेच सामान्य जनतेच्या समस्या मार्गी लावाव्यात अशी मागणी काँग्रेस पक्षाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे. अंबड शहरांमधील एक मुलीचा तपास लागत नाही याप्रकरणी तपास अधिकाऱ्याची बदली करा अशी पण मागणी होत आहे याप्रकरणी पोलीस अधीक्षक याप्रकरणी तात्काळ दखल घेण्यात यावे.

राज्यात अलीकडेच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकी दरम्यान भाजपसह सत्ताधारी महायुती सरकारने राज्यात पुन्हा सत्तेत आल्यावर शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासह अन्य अनेक आश्वासन देण्यात आली होती. मात्र, सत्तेत आल्यानंतर सत्ताधाऱ्यांनी या आश्वासनांची पूर्तता करण्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी दिलेल्या आश्वासनाकडे सत्ताधाऱ्यांचे लक्ष वेधण्यासाठी जालना जिल्हा काँग्रेस पक्षाच्या वतीने आज मंगळवारी शहरातील नूतन वसाहत भागातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करत नूतन वसाहत,अंबड चौफुली मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढला. खा.डॉ.कल्याण काळे, काँग्रेस पक्षाचे जिल्हा प्रभारी माजी आमदार नामदेवराव पवार, माजी आमदार कैलास गोरंटयाल यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा काढण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा धडकल्यानंतर उपरोक्त मान्यवरांच्या नेतृत्वाखाली एका शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांची भेट घेऊन शेतकऱ्यांसह सामान्य जनतेच्या समस्या याबाबत चर्चा करून त्यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. या निवेदनात म्हटले आहे की, शेतकऱ्यांना कर्जमाफी तातडीने जाहीर करावी, दुष्काळग्रस्त भागात पाणीटंचाई निवारणासाठी प्रभावी उपाययोजना करावी, नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना योग्य नुकसान भरपाई देण्यात यावी,पीक विम्याचा लाभ देण्यात यावा, तसेच ''मागेल त्याला सौर कृषी पंप'' योजना तातडीने लागू करावी, शेतकऱ्यांना योग्य हमीभाव मिळावा,ठिबक सिंचनासह विविध कृषी अनुदान योजनांची तात्काळ अंमलबजावणी करण्यासह ग्रामीण भागातील वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा सुरळीत करावा तसेच शेतकऱ्यांना रात्रीऐवजी दिवसा वीज द्यावी आणि थकीत वीजबील माफ करावे,दुधाला किमान ४० रुपये प्रति लिटर हमीभाव मिळावा, दूध उत्पादकांना वेळेवर अनुदान मिळावे आणि पशुखाद्यावर अनुदान द्यावे तसेच महिलांसाठी जाहीर केलेली लाडकी बहिण योजना कोणत्याही अटींशिवाय लागू करावी आणि दरमहा रुपये २१०० अनुदान नियमित द्यावे या मागण्यांसह घरकुल योजना, श्रावणबाळ व संजय गांधी निराधार योजनांच्या लाभार्थ्यांना वेळेवर अनुदान देऊन केसरी शिधापत्रिका धारकांना पुन्हा धान्य वाटप करावे, दिव्यांगांच्या मानधनात वाढ करावी आदी मागण्या काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने केल्या. शासनाने मागण्या मान्य न केल्यास पुढील काळात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा यावेळी देण्यात आला. याप्रसंगी प्रदेश सरचिटणीस अ‍ॅड राम कुराडे, कल्याणराव दळे, राम सावंत, अब्दुल रऊफ परसुवाले, नंदाताई पवार, राहुल देशमुख, बदर चाऊस,महावीर ढक्का, विनोद यादव,शेख रफिक, शेख शमशु, शिवप्रकाश चितळकर, रघुवीर गुडे, सुरेश गवळी, त्रिबंकराव पाबळे, ज्ञानेश्वर शिंदे, रामप्रसाद खरात, कल्याणराव तारडे, वैभव उगले, जाकेर डावगावकर,सय्यद निजाम, जावेद बागवान, शेख इब्राहिम, विनोद रत्नपारखे, वाजेद खान पठाण, रमेश गोरक्षक, फकिरा वाघ, रहीम तांबोळी, संतोष अन्नदाते, सोपान सपकाळ, दत्ता पाटील घुले, रणजित मगरे, अंजेराव चव्हाण, युवराज राठोड,कलीम वस्ताद, फारुख तुंडीवाले,आलोक सरवडीकर यांच्यासह काँग्रेस पक्षाच्या विविध आघाड्यांचे जिल्हा, तालुका, शहर पदाधिकारी, कार्यकर्ते,शेतकरी बांधव उपस्थित होते.

जा.क्र.म.प./अंबड नामांतर
कार्यालय नगर परिषद अंबड २०२५/७२
दिनांक : १३/२/२०२५

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री. सौ. श्रीमती १)आसाराम रोहीदास पवार २) बेबी आसाराम पवार प्रकरण सर्वेनं ११ सहान प्लॉट नं १० सिटी सर्वे नं ३१०२ न.प.मि.त १८-१६१-१० चे हस्तालय करणे बाबत

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमत्ता घर क्र. ( १० ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतुः सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुःसिमा
पुर्व - प्लॉट नंबर ११
पश्चिम :-प्लॉट नंबर १
दक्षिण याच सर्वे नंबर मधील आदर्श नगर प्लॉटींग
उत्तर :- १ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता,

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

# सोयाबीन भाव दबावातच; हरभरा, बेदाणा, कापूस तसेच काय आहेत सोयाबीन भाव?

सरकारने पिवळा वाटाण्याच्या मुक्त आयातीला मुदतवाढ दिली नाही. पिवळा वाटाणा आयातीवर ५० टक्के शुल्क आणि २०० रुपये किमान आयात मूल्य लागू आहे. मात्र सरकार या धोरणात लवकरच बदल करू शकते, याची शक्यता असल्याने हरभरा बाजारात मोठी सुधारणा न होता दर स्थिर होते. आज बाजारात ५ हजार २०० ते ५ हजार ५०० रुपयांच्या दरम्यान हरभरा विकला गेला. बाजारात पुढील दोन महीने आवकेचा दबाव राहणार आहे. त्यामुळे हरभरा बाजारावरील दबावही कायम राहील, असा अंदाज हरभरा बाजारातील अभ्यासकांनी व्यक्त केला.

लग्नसराई आणि सण समारंभामुळे बेदाण्याला चांगली मागणी आहे. अजूनही बाजारातील बेदाणा आक मर्यादीत आहे. यंदा बेदाणा निर्मितीला द्राक्षटंचाई भासली. त्यामुळे बेदाणा निर्मिती संथगतीने सुरू आहे. त्यामुळे बेदाण्याच्या दरात झालेली वाढ टिकून आहे. नव्या बेदाण्याला प्रति किलोस १०० ते २५० रुपये दर मिळत आहे. त्यातच रमजान ईद, होळी सणानिमित्त देशभरातून बेदाण्याला मोठी मागणी आहे. त्यामुळे दरही टिकून राहतील, असा अंदाज बेदणा बाजारातील अभ्यासकांनी व्यक्त केला.



बाजारातील गवारची आवक कमीच आहे. तर गवारला चांगला उठाव आहे. त्यामुळे गवारचे भावही टिकून आहेत. राज्यातील सर्वच बाजारांमध्ये गवारची आवक मर्यादीत दिसत आहे. इतर भाजीपाल्याची आवक वाढली तरी गवार मात्र भाव राखून आहे. बाजारातील आवक आवक आजही कमीच होती. त्यामुळे बाजारात गवारला ५ हजार ते ६ हजारांच्या दरम्यान सरासरी भाव मिळाला. तर पुढील काही आठवडे गवारची आवक सरासरीच काहील, असा अंदाज व्यापारी व्यक्त करत आहे. त्यामुळे दरही टिकून राहतील, असा अंदाज आहे.

देशात सोयाबीनचा बाजार दबावातच आहे. सोयाबीनचा भाव बाजार समित्यांमध्ये प्रतिक्विंटल ३ हजार ७०० ते ४ हजार रुपयांच्या दरम्यान आज भाव मिळाला. तर सोयापेंडचा भाव सरासरी २७ हजार ते २८ हजार रुपयांच्या दरम्यान आजही स्थिर होता. आंतरराष्ट्रीय बाजारात सोयाबीनच्या दरात काहीसे चढ उतार सुरु आहेत. आज सोयाबीन आणि सोयापेंडच्या भावात शुक्रवारच्या तुलनेत काहीशी वाढ झाली होती. बाजारातील सोयाबीनची आवक काहीशी कमी झाली आहे. मात्र सोयाबीनच्या भावावरील दबाव काही आठवडे कायम राहतील, असा अंदाज सोयाबीन बाजारातील अभ्यासकांनी व्यक्त केला.

आंतरराष्ट्रीय बाजारातील कापसातील मंदी आणि देशातील स्थिर उठाव याचा परिणाम दरावर दिसत आहे. कापूस आज सरासरी ६ हजार ८०० ते ७ हजार २०० रुपयांच्या दरम्यान विकला गेला. देशातील बाजारात कापसाची आवक सरासरी एक लाख गाठींच्या दरम्यान कायम आहे. बाजारातील आवक चालू महिन्यात कमी होण्याची शक्यता आहे. तसेच आता शेतकऱ्यांकडील कापसाचा स्टॉकही कमी होत आहे. याचा परिणाम आवकेवर दिसेल. पुढच्या काळात बाजारातील कमी आवक कमी होण्याबरोबर दरात काहीशी सुधारणा दिसू शकते, असा अंदाज कापूस बाजारातील अभ्यासकांनी व्यक्त केला.

## उन्हाळी सोयाबीन लागवड आणि नियोजन

उन्हाळी सोयाबीन हे महत्वाचे तेलबिया पिक म्हणून सर्वत्र घेतले जाते. तसेच हे कडधान्य म्हणून आणि प्रक्रिया करून देखील वापरले जाते. कमी खर्चात जास्तीतजास्त उत्पादन देणारे नगदी पीक म्हणून सोयाबीनच्या क्षेत्रात झपाट्याने वाढ झालेली आहे.

जमिनीचा प्रकार : उन्हाळी सोयाबीनची लागवड ४.५ ते ८.५ च्या पीएच (सामु) असलेल्या जमिनीत केली तरी चालते. ज्या जमिनीत जास्त प्रमाणात पाणी साचुन राहत असेल त्या जमिनीत सोयबीन ची लागवड करु नये.

हवामान : सोयाबीन दिवसा कमी तास सुर्यप्रकाश लागणारे पिक आहे. सोयाबीन ला जसा जसा दिवसाचा सुर्यप्रकाशाचा कालावधी कमी कमी होत जाईल तसे तसे फुल धारणा होत असते. उष्ण हवामान या पिकास चांगले मानवते.

पिकाची जात : मराठवाडा कृषी विद्यापीठाने विकसित केलेल्या एमएयूएस ४७ (परभणी सोना), एमएयूएस ६१ (प्रतिकार), एमएयूएस ६१-२ (प्रतिष्ठा), एमएयूएस ७१ (समृद्धी), एमएयूएस ८१ (शक्ती), एमएयूएस १५८,



एमएयूएस १६२ इ. सुधारित वाणांची निवड करावी.

लागवड : १ एकरात पेरणीसाठी ३० ते ४० किलो बियाणे पुरेसे होते. पेरणीतील अंतर हे दोन ओळीत ७५ से.मी. आणि दोन रोपांत १० .सें.मी. राहील असे करावे. एका ठिकाणी २ किंवा ३ बिया टोचता येतात. पेरणी करताना जमिनीत फार खोलवर पेरणी करु नये.


पाणी व्यवस्थापन : सोयाबीनमध्ये रोप, फुलोऱ्याची व शेंगा भरण्याची अवस्था या पाण्याच्या ताणास संवेदनशील आहेत. या कालावधीत १५-२० दिवसात पाऊस कमी झाल्यास या अवस्थेत पिकास पाणी दिल्यास उत्पादनात भर पडते.

रोग नियंत्रण : उगवणीच्या काळात बुरशीजन्य रोगांपासून संरक्षण होण्यासाठी जैविक बुरशीनाशके किंवा बुरशीनाशकांची बीजप्रक्रिया आवश्यक आहे. क्लोरोपायरीफॉस २० टक्के इसी १.५ लि. प्रति है. किंवा ट्रायझेफॉस ४० टक्के इसी ८ मि.ली. पेरणीनंतर ८ ते १० दिवसांनी आणि पीक फुलोऱ्यात असताना ५-७०० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारावे.

## धने पिकाचे उत्पन्न/काढणी

लागवडीपासुन धणे काढणीपर्यंत जातपरत्वे १०० ते १५० दिवसांचा कालावधी अपेक्षित आहे. कोरडवाहू पिक परिस्थितीमध्ये ६ ते ७ क्विंटल प्रति हेक्टर तर ओलित व्यवस्थापनाअंतर्गत १० ते १२ क्विंटल प्रति हेक्टर उत्पादन अपेक्षित आहे. सर्वसाधारणपणे धणे पिकाची काढणी बियांना तपकीरी रंग येण्याच्या अवस्थेत करतात. यासाठी धण्याच्या पेंड्या बांधून सरळ उन्हात न ठेवता सावलीमध्ये सात ते आठ दिवस साठवून ठेवतात व नंतर काठीने बदडून बियाणे वेगळे करतात किंवा आधुनिक मळणी यंत्राद्वारे धण्याचे बियाणे वेगळे करता येते. बाजारपेठेत हिरव्या रंगाच्या धण्यास अधिक भाव मिळत असल्याने, या पिकाची काढणीची अवस्था अत्यंत महत्त्वाची आहे.

राष्ट्रीय मसाला बियाणे संशोधन संस्था, अजमेर यांच्या शिफारशीनुसार धण्याच्या बियामधून दूधासारखा पांढऱ्या रंगाचा चिकट पदार्थ बोटाने दाबल्यानंतर निघण्याच्या अवस्थेत या पिकाची कापणी करून त्यांच्या पेंड्या/जूड्या बांधतात व त्यानंतर झाडांच्या मूळ्या वरच्या दिशेने



ठेवून या पेंड्या/जूड्या दोन ते तीन आठवडे लटकवून ठेवतात व नंतर त्याची मळणी केली जाते. म्हणजे बाजारपेठेत अपेक्षित असणारे हिरव्या धन्याचे उत्पादन मिळते.

धणे पिकावरील प्रमुख रोग : १) भुरी : हा धण्यावरील महत्वाचा बुरशीजन्य रोग आहे. हा कोथिंबीरीच्या पानावर व कोवळ्या फांद्यावर पांढऱ्या पट्ट्याच्या स्वरूपात आढळून येतो. उपाय :अ) पाण्यात मिसळणारी गंधकाची भुकटी २५ किलो प्रति हेक्टरी फवारणी करावी. ब) लागवडीपूर्वी धणे बियाण्यास थायरमची बिजप्रक्रिया करावी. २) मर : धण्याच्या पिकातील कोवळी झाडे या रोगास बळी पडतात. हा बुरशीजन्य रोग आहे. झाडाची पाने पिवळी पडून नंतर फांद्या पिवळ्या पडतात आणि काही कालावधीतच रोपे मरतात.

उपाय : अ) लागवडीपूर्वी बियाण्यास थायरमची बीजप्रक्रिया करावी.

ब) धणे बियाण्यास ट्रायकोडर्माची ४ ग्रॅम प्रति किलोप्रमाणे प्रक्रिया करावी. धणे पिकावरील प्रमुख किडी

मावा : धने पिकावर प्रामुख्याने मावा ही कीड आढळते. ही किड पाने, फुले व फळांमधील रस शोषण करते. या किडीचा जास्त प्रार्दुभाव झाल्यास उत्पादनात ५० टक्क्यांपर्यंत घट होते.

उपाय : अ) किडींची लक्षणे दिसताच निंबोळी अर्काची ५ टक्के तीव्रतेची फवारणी करावी.

ब) इमीडाक्लोप्रीड या किटकनाशकाची ०.००५ टक्के तीव्रतेची फवारणी करावी

## उन्हाळी हंगामातील भाजीपाला पिकांचे नियोजन

महाराष्ट्र मध्ये उन्हाळी हंगामात प्रामुख्याने कलिंगड,खरबूज, काकडी,दोडका, घोसाळी, कारली,भेंडी, गवार, वांगी, मिरची, चवळी इत्यादी भाजीपाला पिकांचे उत्पादन घेतले जाते. उन्हाळ्यामध्ये या भाजीपाल्याची योग्य व्यवस्थापन करणे फार गरजेचे असते.उन्हाळी हंगामात भाजीपाला लागवडीसाठी प्रमुख्याने अधिक सेंद्रिय कर्ब व पाणी साठवून ठेवणारी परंतु पाण्याचा उत्तम निचरा होणाऱ्या सुपीक जमिनीची निवड करावी.

जमिनीवर आच्छादनाचा वापर : कोरडे व उष्ण वाऱ्यांपासून संरक्षणासाठी शेताच्या चारही बाजूने शेवरी सारखे पिकाची अथवा वाफ्याभोवती मक्याचे दाट लागवड करावी. त्यासोबतच रोगप्रतिकारक जातींची निवड,सिंचनाच्या सुयोग्य व्यवस्थापन व रासायनिक व सेंद्रिय खतांची योग्य संतुलन याकडे व्यवस्थित लक्ष द्यावे. फळांची काढणी शक्यतो संध्याकाळी करावी. स्वच्छ ठिकाणी प्रतवारी व पॅकिंग,साठवण व योग्यवेळी मालवाहतूक या बाबींचा नियोजनपूर्वक एकत्रित वापर करावा. या सगळ्या गोष्टींचे नियोजन केले तर उत्तम प्रतीचा भाजीपाला हा ग्राहकांपर्यंत पोहोचत शकतो.

भेंडी आणि गवार : उन्हाळ्यामध्ये घेतल्या जाणाऱ्या भेंडी व गवार या भाज्यांना मागणी सुद्धा भरपूर असते.भेंडी लागवड करताना हळद्या या रोगास प्रतिकारक्षम आशा परभणी क्रांती, अर्क अनामिका,पुसा सवानी,पंजाब पद्मनी या वाणांची निवड करावी.गवार लागवड करायची असेल तर पुसा सदाबहार,पुसा नवबहार यासारख्या भरपूर उत्पादन देणाऱ्या जातींची निवड करावी.उन्हाळ्यात या पिकांना पाणी वेळेवर द्यावे व पिकांची तोडून संध्याकाळच्या वेळेस करावी.

वेलवर्गीय भाजीपाला पिके : यामध्ये प्रामुख्याने काकडी, कारले, दुधी भोपळा, दोडका इत्यादी



प्रमुख भाजीपाला पिकांचा समावेश होतो.या सर्व भाज्यांची लागवड बियांद्वारे व रुंद अंतर ठेवून केली जाते. लागवडीनंतर बियांची उगवण झाल्यानंतर काही दिवसांनी वेलीला वळण देणे व आधार देणे ही कामे महत्त्वाचे आहेत. दर्जेदार, जास्तीच्या उत्पादनासाठी वेलीला मंडप किंवा तारेच्या ताटीच्या आधार द्यावा. कारली, दुधी भोपळा, दोडका इत्यादी कमकुवत वेल वर्गात मोडणारी पिके असून वेलींना चांगला आधार मिळाला त्यांची वाढ चांगली होते.

मिरची, वांगी आणि टोमॅटो : या तिने पिकांची रोपे गादीवाफ्यावर तयार करावीत. डिसेंबर किंवा जानेवारी महिन्यात गादी वाफ्यावर बियाणे पेरून झाल्यानंतर साधारणपणे जानेवारी ते फेब्रुवारी महिन्यात रोपांची लागवड केली जाते. या पिकांमध्ये विषाणूजन्य रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी त्यांचा प्रसार करणाऱ्या किडींच्या नियंत्रणासाठी दक्ष राहावे. मिरची लागवड करताना तिचे उत्पादन मार्च ते मे महिन्यात बाजारात येईल असे करावे.

लागवडीसाठी वान हा उंचशाकीय वाढणारा, फांद्या जास्त असणारा असणारा तसेच पोपटी ते गर्द हिरव्या रंगाच्या लांब मिरच्यांचा असावा. मिरची मध्ये फुले ज्योती या जातीमध्ये मिरच्या झुपक्यात येतात व झाडावर दाट पाने असतात. वांगी या पिकासाठी उंच व डेरेदार वाड असणारा काटेरी डेट,जांभळ्या, पांढऱ्या व हिरव्या रंगाची छटा एकत्र असणाऱ्या चमक असणारा, गोल किंवा उभट गोल फळे येणाऱ्या वाणाची निवड करावी. वांग्यामध्ये रंग व आकार यानुसार भाग निहाय विविधता आढळून येते. वांगी पिकास शेणखत व रासायनिक खते यांचा संतुलित वापर करावा. उन्हाळी हंगामात योग्य वेळी पाणी द्यावे. फळांची तोडणी पाच ते सहा दिवसांनी करावी. एकसारखे फळे बाजारात पाठवावी. टोमॅटो पिकासाठी वाहन निवडतांना प्रामुख्याने तो वाण अधिक पाने असणारा, उष्ण तापमानात फळधारणा होणारा तसेच लिफकर्ल व्हायरस या रोगास सहनशील व फळांना तडे न जाणारा निवडावा. टोमॅटोची लागवड शक्यतो लवकर करावी.कारण उष्ण हवामानात फळधारणा कमी होते. कांदा पात महाशिवरात्रीस कांद्याची रोपे टाकून त्याची लागवड गुढीपाडवा पर्यंत करावी. उन्हाळ्यात व आषाढी एकादशी पर्यंत कांद्याच्या पातीचे पैसे होतात.

कोथिंबीर : कोथिंबीर पिकास कोरडे हवामान चांगले मानवते. उन्हाळी हंगामात कमी पाण्यावर येणारे कोथिंबिरीचे पीक कमी कालावधीत चांगले पैसे देऊन जाते. कोथिंबीर पिकाची लागवड करताना वाफे तयार करावेत. दर आठ दिवसांच्या अंतराने कोथिंबीरीची लागवड करावी. राजगिरा, पोकळा, माठ व मेथी : उन्हाळी भाजीपाला मध्ये पालेभाज्या महत्त्वाचे आहेत. पालेभाज्या आपल्या आहारातील खनिजे,क्षारआणि जीवनसत्त्वे यांचा पुरवठा करणारे अगदी स्वस्त आणि सहज सुलभ नैसर्गिक स्रोत आहे शेतकऱ्यांच्या दृष्टीने पालेभाज्या या अल्प भांडवल,कमी क्षेत्रात तसेच कमी वेळात उत्पादन देतात. पालेभाज्या लागवडीसाठी पाण्याचा हमखास, सलग पुरवठा तसेच बाजारपेठ जवळ असणे व वाहतुकीची व्यवस्थित सोय असणे या बाबी महत्त्वाच्या आहेत. उन्हाळ्यामध्ये कमी वेळेत चांगला पैसा मिळवायचा असेल तर राजगिरा, पोकळा, माठ व मेथी या पालेभाज्या घेतल्या जातात.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५५८ : फ्रॅन्सिस्को फर्नांडीस याने धूम्रपानासाठी सर्वप्रथम तंबाखूचा वापर केला.
१६६६ : शिवाजीमहाराजांनी राजगडावरून आग्र्यास प्रयाण केले.
१८५१ : 'जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया'ची स्थापना
१९०४ : निकोला टेसला यांनी बॉल लाइटनिंग ची व्याख्या जगासमोर ठेवली.
१९३१ : दुसर्या गोलमेज परिषदेपुर्वी गांधी-आयर्विन करार झाला.
१९३१ : महात्मा गांधीजीनी उभारलेल्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीनंतर गांधी आणि आयर्विन यांच्यामध्ये करार झाला.
१९३३ : भयानक मंदीमुळे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन डी. रुझव्हेल्ट यांनी सर्व बँका काही दिवसांसाठी बंद केल्या व आर्थिक व्यवहारांवर बंदी घातली.
१९४९ : आजच्या दिवशी झारखंड पार्टी ची स्थापना झाली.
१९६६ : मैसूरचे माजी संस्थानिक जयचामराजेन्द्र वडियार यांचा बंगळूर येथील राजवाडा व त्यासभोवतालची जागा राज्य सरकारच्या ताब्यात घेण्याची परवानगी देणारे विधेयक कर्नाटक विधानसभेत संमत
१९८२ : आजच्या दिवशी "वेनेरा १४" या अवकाशयानाने बुध ग्रहाच्या कक्षेत प्रवेश केला.
१९९७ : ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधीच्या सप्तशताब्दीच्या सांगतेनिमित्त राष्ट्रपती शंकरदयाळ शर्मा यांच्या हस्ते ज्ञानेश्वरांची प्रतिमा असणार्या टपाल तिकिटाचे प्रकाशन
१९९७ : धार्मिक जनजागृतीबद्दल दिला जाणारा जॉन एम. टेम्पलटन पुरस्कार पांडुरंगशास्त्री आठवले यांना जाहीर करण्यार आला.
१९९८ : नेहमीच्या अस्त्रांबरोबरच कमी पल्ल्याची विमानभेदी क्षेपणास्त्रे सोडू शकणार्या, रशियाकडुन घेतलेल्या 'सिंधुरक्षक' या पाणबुडीचे मुंबई येथे आगमन
१९९९ : 'इंडियन फिजिक्स असोसिएशन' तर्फे देण्यात येणार्या आर. डी. बिर्ला स्मृती पारितोषिकासाठी डॉ. जयंत नारळीकर व प्रा. अशोक सेन यांची निवड
२००० : पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या हस्ते कर्नाटकातील कैगा अणूवीजप्रकल्प (युनिट २) राष्ट्राला अर्पण
२००१ : सौदी अरेबिया च्या मक्का मदिना येथे झालेल्या चेंगराचेंगरीत ४० यात्रेकरू मारले गेले.
२००२ : आजच्या दिवशी ऑस्ट्रेलिया येथे कॉमनवेल्थ समिट चा समारोप झाला.
२००७ : राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण अयोग्य स्थापना
२००९ : इंडियन फार्मर्स फर्टिलाइजर को-ऑपरेटिव लिमिटेड हि आजच्या दिवशी एका वर्षामध्ये एक करोड़ टन ची विक्री करणारी जगातील पहिली कंपनी ठरली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५१२: भूगोलतज्ज्ञ, गणित आणि नकाशा शास्त्राचे जनक जेरार्डस मर्केटर. रामकृष्ण परमहंस.
१५१२: गेरहार्ट मरकेटर नकाशाकार, गणितज्ञ आणि तत्त्वज्ञ (मृत्यू: २ डिसेंबर १५९४)
१८९८: चाऊ एन लाय चीनचे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: ८ जानेवारी १९७६)
१९०५: आजच्या दिवशी भगत सिंह यांची काही देशाहिता च्या कार्यांमध्ये मदत करणारी स्वातंत्र्य सैनिक सुशीला दीदी यांचा जन्म.
१९०८: सर रेक्स हॅरिसन ब्रिटिश आणी अमेरिकन रंगभूमीवरील आणि हॉलिवूड चित्रपटांतील अभिनेते (मृत्यू: २ जून १९९०)
१९१०: संपादक श्रीपाद वामन काळे यांचा जन्म.
१९१३: गंगूबाई हनगळ किराणा घराण्याच्या शास्त्रीय गायिका (मृत्यू: २१ जुलै२००९)
१९१६: बिजू पटनायक ओरिसाचे मुख्यमंत्री, केन्द्रीय पोलाद, खाणकाम आणि कोळसा मंत्री (मृत्यू: १७ एप्रिल१९९७)
१९२५: माजी लोकसभा सदस्य वसंत साठे यांचा जन्म.
१९५८: भारतीय अभिनेता एम.नासार यांचा जन्म.
१९५९: मध्यप्रदेश चे मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांचा जन्म.
१९७४: अभिनेता हितेन तेजवानी यांचा जन्म.
१९८४: भारतीय दक्षिणात्य चित्रपट अभिनेत्री आरती अग्रवाल यांचा जन्म.
१९९०: हिंदी तसेच ऑस्ट्रेलियन चित्रपटांमध्ये काम करणारी अभिनेत्री पल्लवी शारदा यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५३९ : नुनो दा कुन्हा, भारतातील पोर्तुगीझ गव्हर्नर.
१८२७ : इटालीय भौतिकशास्त्रज्ञ अलासांड्रो व्होल्टा यांचे निधन. (जन्म: १८ फेब्रुवारी १७४५)
१९१४ : नाटककार, समीक्षक आणि प्राध्यापक शांताराम अनंत देसाई यांचे निधन.
१९५३ : सोव्हियत रशियाचे राष्ट्राध्यक्ष जोसेफ स्टॅलिन यांचे निधन. (जन्म: १८ डिसेंबर १८७८)
१९६६ : साम्यवादी विह्चारांचे व्यासंगी नेते शंकरराव मोरे यांचे निधन.
१९६८ : मराठीचे संशोधक नारायण गोविंद चाफेकर.
१९८५ : महाराष्ट्र संस्कृतीकार पु. ग. सहस्रबुद्धे यांचे निधन.
१९८५ : कोशागार, तत्वज्ञ तत्त्वज्ञान महाकोशाचे संपादक देविदास दत्तात्रय वाडेकर यांचे निधन.
१९८९ : गदार पार्टीचे एक संस्थापक बाबा पृथ्वीसिंग आझाद यांचे निधन.
१९९५ : हिंदी चित्रपट अभिनेते जलाल आगा यांचे निधन.
२०१३ : व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष ह्युगो चावेझ यांचे निधन. (जन्म: २८ जुलै १९५४)

# प्राध्यापक भरतीसाठी मुंबईत आझाद मैदानावर तीव्र आंदोलन!

पाटोदा । प्रतिनिधी

नेट, सेट, पीएच.डी धारक संघर्ष समिती महाराष्ट्र राज्य यांनी अनेक वर्षापासून प्रलंबित असलेली प्राध्यापक भरती सुरू करण्यासाठी अधिवेशनाच्या कालावधीत मुंबईतील आझाद मैदानावर १ मार्चपासून आंदोलन सुरू केले आहे. नेट, सेट,पीएच.डी धारक संघर्ष समितीने आतापर्यंत अनेक सत्याग्रह, आंदोलने, पदयात्रा काढून शासनास वेळोवेळी प्राध्यापक भरती सुरू करण्यासाठी प्रयत्न केले आहे. पुढील चार प्रमुख मागण्यांसह सध्या समितीने मुंबईतील आझाद मैदानावर बेमुदत आंदोलन सुरू केले आहे.

संघटनेच्या पुढील प्रमुख मागण्या: १) शासन व यूजीसीच्या निर्देशानुसार शंभर १०० टक्के प्राध्यापक भरती करावी. २) सी.एच.बी पद्धत कायमची बंद करून समान काम समान वेतन (वर्षभराच्या नियुक्तीसह ८४ हजार रुपये दरमहा वेतन) लागू करावे. ३)विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये कायमस्वरूपी पूर्णवेळ सहाय्यक प्राध्यापकांची नियुक्ती करावी. ४) २४ नोव्हेंबर २००१ पूर्वीच्या ७८ महाविद्यालयाला अनुदान देण्यात यावे.




३० मार्च २०२४ पर्यंत राज्यातील सर्व अशासकीय महाविद्यालयांमध्ये ११०८७ प्राध्यापक पदे रिक्त झाली असून या पदांच्या ४०% म्हणजेच ४४३५ जागांचा प्रस्ताव वित्त मंत्रालयामध्ये धुळखात पडला आहे. या फाईलला वारंवार त्याच- त्याच क्युरी लावल्याचे वारंवार समोर येत आहे. याचाच एक भाग म्हणून संचालक कार्यालयाच्या माध्यमातून ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत रिक्त जागांचा आढावा घेण्यात आला. या आढाव्यानुसार आत्तापर्यंत १२००० जागा रिक्त असून शासन मात्र भरतीसाठी वेळकाढूपणा करण्याचे निदर्शनास येत आहे. शासनाने दीड वर्षापासून ४०% जागा भरण्याची तयारी दाखवली. अद्याप यासाठी प्राध्यापक भरतीचा जीआर आला नाही. चंद्रकांत दादांनी विद्यापीठातील जागासह अशासकीय महाविद्यालयातील जागा भरण्यासाठी मा. राज्यपाल महोदयांनी परवानगी दिल्याचे वर्तमानपत्रातून प्रसिद्ध केले आहे. ते स्वत११०००: जागा भरण्यासाठी आग्रही असल्याचे अनेक प्रसिद्धी पत्रातून समोर आले आहे. त्यांची ही घोषणा खरंच अमलात येणार का? हा प्रश्न उच्चशिक्षितांसमोर उभा राहिला आहे. प्राध्यापकांच्या रिक्त जागा वाढत चालल्यामुळे व प्राध्यापक भरतीसाठी फक्त आश्वासन देत असल्यामुळे उच्चशिक्षितांमध्ये भीतीचे वातावरण आहे. आतापर्यंत अनेक प्राध्यापकांनी नोकरीच्या तणावातून आपले जीवन संपवल्याची उदाहरणे समोर येत आहे. अधिवेशन कालावधीत अकृषी विद्यापीठासह अशासकीय महाविद्यालयातील प्राध्यापक भरतीचा अध्यादेश जाहीर करावा. उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिलेल्या प्रस्तावावर वित्त विभागाने लवकर स्वाक्षरी करावी. अन्यथा हे बेमुदत आंदोलन असेच सुरू राहील. तसेच मार्च एप्रिल महिन्यात होणाऱ्या सर्व परीक्षांवर प्राध्यापक बहिष्कार टाकतील आणि यास शासन व वित्त विभाग जबाबदार राहील असा इशारा महाराष्ट्र राज्य नेट, सेट पीएच.डी धारक संघर्ष समितीचे राज्य समन्वयक डॉ. विकास गवई यांनी शासनाला दिला आहे.

## संत तुकाराम महाराजांच्या ३७५ व्या अमृतमहोत्सवी बीज सोहळ्याचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

जगाला शुद्ध भक्तीचा आणि क्रांतीचा संदेश देणारे वारकरी संप्रदायाचे कळस म्हणजे जगद्गुरु संत तुकाराम महाराज आहेत. बीड शहरापासून जवळच असणाऱ्या तळेगाव काकडहिरा दरम्यान असणाऱ्या जगद्गुरु संत श्री तुकोबाराय सेवापीठामध्ये यावर्षी जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या ३७५ व्या अमृतमहोत्सवी बीज सोहळ्याचे दि. ०९ मार्च २०२५ ते १६ मार्च २०२५ या कालावधीत आयोजन करण्यात आलेले आहे. संत श्री तुकोबाराय यांनी दिलेले शब्दधन म्हणजे तुकोबांची अमृतवाणी आजही बीजरूपाने उपलब्ध आहे. पुढील पिढीमध्ये त्या शब्दधनाचे बीजारोपण होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तुकाराम महाराजांच्या जीवनातील विविध पैलूंवर प्रकाश टाकण्याचे काम या सोहळ्याच्या निमित्ताने होणार आहे. तळेगाव येथील जगद्गुरु तुकोबाराय संत फिट येथील वीज सोहळ्याचे हे चौदावे वर्ष आहे. शेतकरी कष्टकरी तसेच सर्व समाजाचा उद्धार करण्यासाठी संतांनी कार्य केले. संत विचारांचा जागर करण्यासाठी मागील चौदा वर्षापासून हे काम अविरत चालू आहे. यावर्षी बीज सोहळ्याच्या निमित्ताने पहाटे ४ ते रात्री १२ पर्यंत काकडा, विष्णू सहस्त्रनाम, गाथा पारायण, नामचिंतन, हरिपाठ, कीर्तन, हरिजागर अशा दैनंदिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. दि.०९ मार्च पासून ह.भ.प.श्रीमंत महाराज तांदळे, ह.भ.प.माधव महाराज डाके, ह.भ.प.त्र्यंबक महाराज मातकर, ह भ प श्रीकृष्ण महाराज उबाळे, ह भ प भागवत महाराज मोटे, ह भ प प्राचार्य परशुराम महाराज मराडे, ह भ प रामकृष्ण बापू रंधवे यांची रात्री ८.३० ते १०.३० या वेळेत हरिकीर्तन सेवा होणार आहेत. दि. ११ मार्च रोजी नगद नारायण महाराज पुण्यतिथी निमित्त सकाळी ११ ते १ या वेळेत भाऊसाहेब महाराज धांडे यांचे विशेष किर्तन होणार आहे. दि. १६ मार्च रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत जगद्गुरु तुकोबाराय विचार प्रबोधीनीचे संस्थापक गाथाप्रेमी ह.भ.प. दत्ता महाराज दोन्हे पाटील लवासा, पुणे यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. या आगळ्यावेगळ्या बीज सोहळयाचा जास्तीत जास्त भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन तळेगाव काकडहिरा गावकरी तसेच जगद्गुरु संत श्री तुकोबाराय सेवापिठाच्या वतीने ह.भ.प.परशुराम महाराज मराडे यांनी केले आहे.



## ऐतिहासिक कारंजा टॉवरसाठी अनेक हात सरसावू लागले



बीड । प्रतिनिधी

शहराची ऐतिहासिक ओळख असलेल्या कारंजा टॉवर ची दुर्दशा लवकरच संपणार असे आता वाटू लागले आहे. कारण टॉवर चे नूतनीकरण परिपूर्ण व्हावे. या ऐतिहासिक इमारतीला पूर्व वैभव पुन्हा प्राप्त व्हावे. याकरिता ज्येष्ठांसह तरुणांची फळी पुढे सरसावली आहे. यामुळे मिले जो कड़ी-कड़ी एक ज़ंजीर बने या म्हणीप्रमाणे लोक आपसात जोडले जात असून कारंजा टॉवर चे रूप सर्वांग सुंदर करण्यासाठी झपाटले आहे.

कारंजा टॉवरचे नूतनीकरण परिपूर्ण करावे म्हणून १४ फेब्रुवारी २०२५ रोजी देण्यात आलेल्या निवेदनानंतर आतापर्यंत प्रत्येक दिवशी कारंजा टॉवरसाठी ज्येष्ठ आणि तरुण मिळून काही ना काही प्रयत्न व कार्य करीत आहे. टॉवरला लागून प्रथम चार सिमेंटचे बाकडे ठेवण्यात आले. आता त्यात अजून एका सिमेंट बाकड्याची भर पडली असून आता सिमेंट बाकड्यांची संख्या पाच झाली आहे. अजूनही दहा एक सिमेंट बाकड्यांची गरज आहे. सर्वांचे सहकार्य असेच राहिले तर उर्वरित जागेवर आवश्यक त्या संख्येत सिमेंटचे बाकडे येतील हे नक्की. या बाकड्यांमुळे ज्येष्ठ व वयोवृद्धांसह तरुणांना सुद्धा निसर्गरम्य व नयनरम्य वातावरणात बसण्याचा आनंद मिळू लागला आहे. आतापर्यंत लोकसहभागातून कारंजा टॉवरची साफसफाई करून पाण्याने धुऊन घेण्यात आले आहे. पाण्याच्या फवाऱ्यासाठी बांधण्यात आलेल्या हौदाची साफसफाई करण्यात आली आहे, तेही धुवून घेण्यात आले आहे. ऐतिहासिक कारंजा टॉवरच्या इमारतीला मोठ्या प्रमाणात विद्रूप करणारे डिजिटल बॅनर चे फ्रेम काढून टाकण्यात आले आहे. टॉवर समोर कचरा आणून टाकणाऱ्यांना येथे कचरा टाकू नका, हे टॉवर आपल्या शहराची ऐतिहासिक ओळख आहे असे समजावून सांगितले जात आहे. एकीकडे लोकसहभागातून अशाप्रकारे कार्य होत असताना दुसरीकडे बीड नगर परिषद आणि जिल्हा प्रशासन मात्र बेडूक गिळून निपचित पडलेल्या सापासारखे अजूनही बेशुद्ध असल्याचे दिसत आहे. हे दोन्ही सरकारी प्रशासन अजूनही कारंजा टॉवर साठी आवश्यक असलेली कामे करण्यासाठी पुढे आलेले नाहीत. या दोन्ही कार्यालयांची अशी अनास्था पाहून मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ़, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेशराव गंगाधरे, तालेब पटेल, युवा कार्यकर्ते फारुख शेख यांनी जोपर्यंत कारंजा टॉवर चे नूतनीकरण परिपूर्ण होत नाही तोपर्यंत स्वस्थ बसणार नाही असे म्हटले आहे.

## संच मान्यतेच्या विरोधात निवेदन सादर; कमी पटसंख्याच्या शाळा वाचवा

माजलगाव (प्रतिनिधी)

राज्यातील कमी पटसंख्येच्या शाळा वाचवून तेथील विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान टाळणे,शासनाच्या अन्यायकारक संच मान्यता निकष विरोधात दि.२ मार्च सोमवार रोजी आमदार प्रकाश सोळंके, विधानसभा मतदारसंघ माजलगाव यांना महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती शाखा माजलगावच्या वतीने आमदार प्रकाश सोळंके यांचे स्वीय सहाय्यक नाना नाटकर यांच्याकडे निवेदन देण्यात आले.

राज्यातील वाडी, वस्ती,तांडे, डोंगराळ,दुर्गम भागात छोट्या गावात उच्च प्राथमिकच्या वर्गात अनेक ठिकाणी २० किंवा २० पेक्षा कमी पटसंख्या आहे. इतरही ग्रामीण भागातील कुटुंबांचे रोजगार व अन्य कारणांमुळे स्थलांतर झाल्याने वा अन्यकारणामुळे बऱ्याच शाळेत २० किंवा २० पेक्षा कमी पटसंख्या आहे. अशा शाळेत नवीन संच मान्यतेनुसार शिक्षकांचे एकही पद मंजूर राहिलेले नाही. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात २५ हजार पेक्षा अधिक प्राथमिक शिक्षक अतिरिक्त ठरत आहेत. कमी पटसंख्येच्या उच्च प्राथमिक शाळातील वर्गांसाठी शिक्षकांचे शून्य पद शिल्लक राहिल्याने त्या शाळेतील विद्यार्थ्यांना एकही शिक्षक मिळणार नाही. तेथील विद्यार्थ्यांना बाहेर गावच्या शाळेत स्थलांतरित व्हावे लागेल. त्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान सोबतच सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न भविष्यात निर्माण होणार आहे. मुलींचे शिक्षण थांबणार. ग्रामीण भागातील शिक्षण या माध्यमातून उध्वस्त होणार आहे. करिता १५ मार्च २०२४ शासन निर्णय ताबडतोब रद्द होण्यासाठी आपण जातीने लक्ष घालून ग्रामीण भागातील मुला मुलींचे शिक्षण वाचवावे. गोरगरीब, शेतकरी ,शेतमजूर, शोषित ,वंचितांच्या मुला -मुलींचे शिक्षण वाचवण्यासाठी आपण पुढाकार घ्यावा. माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार सन्माननीय प्रकाश दादा सोळंके यांना विनंती करण्यात येत आहे. हे निवेदन महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे तालुका अध्यक्ष- केशव बादाडे, विष्णू झोंबाडे, बबन पोटे, बालासाहेब बचाटे, बंडू सोनवणे, शिंदे एस. आर. सर, ओंकार बादाडे तसेच महाराष्ट्र राज्य शिक्षक संघाचे तालुका अध्यक्ष- विठ्ठल आरबे यांनी दिले.



## निमगाव मायंबा'लमाणतांडा'ला महसूली गावात रूपांतर करण्याची अधिसूचना जारी

बीड । प्रतिनिधी

शिरूर कासार तालुक्यातील मौजे निमगाव मायंबा अंतर्गत असणाऱ्या लमान वाडी तांडा क्रमांक दोन ला लमान तांडा अधिसूचना रद्द करून महसुली गावात रूपांतरित करण्याची अधिसूचना जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी जाहीर केली आहे.

याबाबतच्या आदेशात त्यांनी म्हटले आहे की, शासकीय अधिसूचना महसूल व वन विभाग क्रमांक टीएलसी १०७६/६३९२३/म-६ दि. १ जुलै १९७६ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४१) त्याच्या कलम ४ च्या पोटकलम (१) च्या परंतुकाखाली राज्य शासनास असलेल्या ज्या शक्ती मला प्रत्यायोजित करण्यात आल्या आहेत. त्यांचा वापर करुन मी, अविनाश पाठक, जिल्हाधिकारी बीड मौजे निमगाव मायंबा अंतर्गत अधिसूचना दि. २८ फेब्रुवारी २०११ अन्वये रुपांतरीत करण्यात आलेले लमाणवाडी नं. १ व अधिसूचना दि. ३१.०१.२०२२ अन्वये रुपांतरीत करण्यात आलेले लमाणवाडी तांडा क्र. ०२ अधिसूचना रद्द करत असून याव्दारे दि. ३१.०४.२०२५ पासून बीड जिल्हयाच्या शिरुर कासार तालुक्यातील मौजे निमगांव मायंबा पैकी एकच 'लमाणतांडा'ला महसूली गावात रुपांतर करीत आहे. सोबतच्या परिशिष्टामध्ये प्राथमिक स्वरुपात प्रसिध्? करण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी यांनी पाठविलेल्या अधिसूचनेमध्ये नमूद केले आहे.

## बालकांच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल मंगेश बबन जाधव यांचा गौरव

बीड । प्रतिनिधी

बीड- महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई यांच्या द्वारे आयोजित बालस्नेही पुरस्कार २०२४ साठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, बीड येथील कार्यरत मंगेश बबनराव जाधव यांनी बालकांच्या क्षेत्रात उल्लेखनीय प्रशाकीय कामकाज केल्याबद्दल;उत्कृष्ट परिविक्षा अधिकारी राज्यस्तरीय बालस्नेही पुरस्कार करिता छत्रपती संभाजीनगर विभागातून निवड झाली होती. सदर

तीन मार्च रोजी रोजी आदिती तटकरे मंत्री महिला व बाल विकास यांचे शुभ हस्ते यशवंतराव चव्हाण सेन्टर मुंबई येथे पुरस्कार प्रदान करण्यात आला.या वेळी मेघना बोर्डीकर राज्यमंत्री महिला व बालविकास, मनीषा कांयंदे, राज्यमंत्री पंकज भोयर तसेच प्रशांत नारनवरे, राज्यपाल यांचे सचिव सुशिबेन शाह अध्यक्ष,प्रज्ञा खोसरे, जयश्री पालवे प्रमुख पाहुणे उपस्थित होते. सदर पुरस्कार जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी बीड या कार्यालयात बहुतांशी पदे रिक्त असताना बीड जिल्ह्यात सन २०२३-२४ या कालावधी एकूण २५५ बाल विवाह रोखून २२ प्रकरणात दाखल करण्यात आले.बाल विवाह निर्मुलन अभियान उत्तम रित्या राबवण्यात त्यांचे योगदान, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांना ३८५८ बालकांना बाल संगोपन योजनेचा लाभ दिला, अनाथ बालकांसाठी सरकारी नौकरी व शिक्षणत १ आरक्षण लाभ देण्यास एकूण २८० बालकांना अनाथ प्रमाणपत्र निर्गमित केले. बहुतांशी बालकाना त्याचा सरकारी नौकरी व शिक्षण यामध्ये लाभ झाला आहे.बीड जिल्ह्यात बालकांच्या निवासी संस्था जसे की बालगृह, निरीक्षण गृह यातून देखील काळजी व संरक्षण गरज असलेले बालकांना आहार,शिक्षण, व निवास व्यवस्था उपलब्ध करून दिली. अशा त्यांच्या उल्लेखनीय कामास पाहता त्यांची दखल घेऊन शासनाने हा पुरस्कार देऊन हा गौरव केला आहे.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**

**मा. के सी बागल मॅडम, ८ वे दिवाणी न्यायाधीश क.स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक : ४०९/२०२५**

**पारूबाई - वि. निरंक**

**(मार्फत ॲड. एस.आर.पाखरे बीड)**

ज्याअर्थी मयत नामे किसन मारोती वाळेकर रा. कदमवाडी ता.जि.बीड हे दि. २०.०२.२०२३ रोजी मौजे कदमवाडी ता.जि.बीड येथे रहातेघरी मयत झाले आहेत.

अर्जदार १) पारुबाई किसन वाळेकर रा. डोकेवाडा कदमवाडी ता.जि.बीड,२) नारायन किसन वाळेकर रा. शिवाजीनगर, दैठणा खुर्द, तिर्थपुरी ता.जि. जालना, ३) अरून किसनराव वाळेकर रा. डोकेवाडा कदमवाडी ता.जि.बीड, ४) बाळासाहेब किसनराव वाळेकर रा. डोकेवाडा कदमवाडी ता.जि.बीड,५) मुक्ताबाई सुंदरराव कदम रा. रामनगर, ता. माजलगांव जि.बीड ,६) आशाबाई अभिमान वाघुले रा. गणेशनगर, अंकुशनगर, ता. अंबड जि. जालना शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे किसन मारोती वाळेकर रा. कदमवाडी ता.जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**आज /०३/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. पुढील तारीख : १९.०४.२०२५**

स्वाक्षरित
**क लिपीक**

(शिक्का)

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

## संतोष देशमुखांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा द्या

### लिंबागणेशकरांनी उत्स्फूर्त बंद पाळला



लिंबागणेश । प्रतिनिधी

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांना अमानुषपणे मारहाण करताचे व्हिडिओ आरोपीने काढल्यानंतर ते व्हिडिओ सीआयडीने रिकव्हर करीत त्यातील स्क्रीन शाट चार्जशीटला जोडले आहेत.आता हे स्क्रीन माध्यामांच्या हाती लागले असुन ते फोटो माध्यमांनी प्रकाशित केल्यानंतर सर्वसामान्य माणसांचे मन हेलावून गेले असुन संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला आहे.संतोष देशमुखांचा अमानुष छळ करून मृतदेहाची विटंबना केल्याने जनसामान्यांत संतापाची लाट उसळली आहे. बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील सर्व समाजातील ग्रामस्थांनी आज दि.४ मंगळवार रोजी सर्व दुकाने स्वयंस्फूर्तीने बंद ठेवत गावच्या वेशीवर '' स्व.संतोष आण्णा देशमुख अमर रहे'' मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा झालीच पाहिजे अशा घोषणा देत उत्स्फूर्त बंद पाळला. यावेळी राजेभाऊ गिरे,पांडुरंग वाणी, बाळकृष्ण थोरात, साहेबराव निर्मळ, अशोक वाणी,विनायक मोरे,दशरथ दाभाडे, विठ्ठल कदम, दिनेश जाधव, महेश ढवळे, बाजीराव नाईगडे, रामकिसन गिरे, अमोल साळवे, अर्जुन घोलप,रवी वायभट, हरिओम क्षीरसागर, डॉ.गणेश ढवळे आदि उपस्थित होते.

स्व.संतोष देशमुख यांना न्याय मिळण्यासाठी मंत्री धनंजय मुंडे यांचा पोलिस प्रशासनावर दबाव असल्याने निष्पक्ष तपास होणार नसल्याने त्यांचा राजीनामा घ्यावा.अशी बीडकरांची मागणी होती.मात्र पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांनी याकडे दुर्लक्ष केल्यामुळे एकंदरीतच बीडचे पालकमंत्री बीडमधील स्व.संतोष देशमुख यांच्या अमानुष हत्येप्रकरणी संवेदनशील असल्याचे दिसून आले नाही. मुख्यमंत्री यांनी मागील केल्यानंतर धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिला. त्यामुळे आता नैतिकता म्हणून अजितदादा पवार यांनी बीड पालकमंत्री पदाचा राजीनामा देऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीडचे पालकमंत्री पद स्विकारावे अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

## शासकिय गोदाम हमालांचे विविध मागण्या संदर्भात बेमुदत कामबंद आंदोलन

माजलगाव । प्रतिनि मजूरी गेली सहा महिन्यापासून पुरवठा विभागाच्या दूर्लक्षामुळे मिळत नसल्याने व इतरही अत्यावश्यक मागण्या संदर्भात दिनांक २६ फेब्रुवारी २०२५ पासून बीड जिल्ह्यासह सर्व तालुक्यातील हमालांनी शासकिय धान्य गोदाम हमाल पंचायतचे अध्यक्ष राजकुमार घायाळ यांच्या नेतृत्वाखाली बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले आहे.

शासकिय धान्य गोदाम हमाल पंचायत संलग्न महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाचे अध्यक्ष राजकुमार घायाळ यांनी बीड जिल्ह्यातील पुरवठा विभागाच्या निष्क्रिय धोरणा विरोधात व शासकिय गोदाम हमालांच्या न्यायीक मागण्या संदर्भात कामबंद आंदोलन सुरू केले आहे त्यामध्ये प्रमुख मागणी म्हणजे जिल्ह्यातील पुरवठा विभागाच्या दुर्लक्षामुळे गेली सहा महिन्या पासुन हमालांना मजूरी मिळाली नाही. तसेच महागाई निर्देशांकाबाबत माननीय उच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२३ रोजी आदेश देऊनही त्यांची अंमलबजावणी अद्यापही केली नाही , शासनाने आदेश देऊनही थेट वाहतूक टप्पा एक व टप्पा दोन चे काम गोदामातील हमाला कडून करून देण्याचा आदेशाची अद्याप अंमलबजावणी झालेली नाही , माथाडी मंडळाने बीड शहर गोदामातील हमालांचे काम पूर्ववत त्याच गोदामातील हमालाकडून करून घेण्याच्या पत्रा बाबत कुठलीही कारवाई केलेली नसल्याने दिनांक २६ फेब्रुवारी २०२५ पासून बेमुदत कामबंद आंदोलन सुरू असुन या आंदोलनात माजलगाव तालुक्यातील शासकीय गोदाम हमाल वैजनाथराव शिंदे , दशरथ शिंदे , ज्योतीराम खामकर , पांडुरंग शिंदे,विजय साळवे , राजभाऊ वाघमारे , लक्ष्मण होके ,गोविंद होके , देविदास होके,वैभव पारवे , महादू धुमाळ आदिंनी सहभागी झाले आहेत.

# 'उमेद'ची उमेद वाढली, जिल्ह्यात ७१ हजार लखपती दिदी

## मार्च अखेर ८५००० महिलांना लखपती करणार -संगीता देवी पाटील

बीड । प्रतिनिधी

**बीड जिल्ह्यामध्ये उमेद च्या माध्यमातून आजपर्यंत जवळपास ७१ हजार ३५६ लखपती दीदी झाल्या असून येत्या मार्च अखेर ८५००० महिलांना लखपती दीदी करणार असल्याची माहिती उमेदच्या प्रकल्प संचालक सौ. संगीता देवी पाटील यांनी दिली यावेळी त्यांनी ३०० महिलांना पॅकेजिंग - लेबलिंग चे प्रशिक्षण देण्यात आल्याचेही सांगितले. महिलांनी उत्पादित केलेले प्रॉडक्ट मिनी सरस, राज्यसरस, तसेच आठवडी बाजारामध्ये ही विक्रीसाठी ठेवण्यात येत असल्याची माहितीही त्यांनी दिली.**

बीड जिल्हा हा काही विषयांमध्ये बदनाम झाला असला तरी या जिल्ह्यामध्ये अनेक चांगल्या गोष्टी घडतात.हे ही तितकेच खरे. बीड जिल्ह्यामध्ये बचत गटाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होत आहे. अनेक महिलांना यातून रोजगार मिळत आहे. छोटे छोटे उद्योग उभारून महिला स्वावलंबी होत आहेत. जिल्हा परिषदेच्या उमेद अभियानाच्या माध्यमातून आतापर्यंत उमेदच्या सर्व कर्मचारी आणि प्रतिनिधींनी प्रयत्न करून ७१३५६ महिलांना लखपती दीदी केले आहे. येत्या मार्च अखेर जिल्ह्यातील ८५००० महिलांना लखपती करणार असल्याची माहिती प्रकल्प संचालक सौ. संगीतादेवी पाटील यांनी दिली. यासंदर्भात बोलताना संगीता देवी पाटील म्हणाल्या की जिल्ह्यात एकूण १७८२९ स्वयंसहाय्यता समूह आहेत .यातून एक लाख ८३ हजार २२८ कुटुंब उमेद अभियानाशी जोडले गेले आहेत. या उमेद अभियाना मार्फत विविध स्तरावर गट तयार करून महिलांना मार्गदर्शन केले जाते जिल्ह्यामध्ये १०५६ ग्राम संघ, ६० प्रभाग संघ स्थापन करण्यात आले आहेत .लखपती देवीची माहिती मोबाईल मध्ये भरण्याच्या कामात बीड जिल्हा मराठवाड्यामध्ये प्रथम क्रमांकावर आहे. सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात ४४८६ गटांना



१२,१८६.८३ लक्ष रुपये कर्ज वितरित करण्यात आले आहे. तर गटातील महिलांना वैयक्तिक व्यावसाय कर्जासाठी २६१९ कर्ज प्रस्ताव बँकेकडे सादर करण्यात आले होते. त्यापैकी ९५६ प्रस्ताव मंजूर झाले असून या मार्फत १३५३ लक्ष रुपयाचा निधी बँकेमार्फत वितरीत करण्यात आला आहे. याशिवाय समुदाय गुंतवणूक निधी, खेळते भांडवल व गटाची बचत या माध्यमातून १८२५६ नवीन उद्योग - व्यवसाय सुरू करण्यात आले आहेत. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत जिल्ह्यातील अकरा तालुक्यातील महिला समूह उत्कृष्ट उत्पादने, अन्नप्रक्रिया उत्पादने तयार करीत आहेत. याशिवाय गटातील महिला स्वादिष्ट जेवण, नाश्ता तसेच इतर ग्रह उपयोगी वस्तू तयार करून विक्री करण्याचा व्यवसाय करीत आहेत. स्वयंसहायता समूहाच्या उत्पन्न वाढीसाठी व त्यांच्या उत्पादनाच्या विक्रीसाठी योग्य बाजारपेठ मिळवून देण्याकरिता विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी अनित्य जिवने यांच्या मार्गदर्शनाखाली अभियानाची प्रगती समाधानकारक असून येत्या मार्च अखेर लखपती दीदींची संख्या ८५००० पर्यंत जाईल. तसेच महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ मिळावी म्हणून ३०० महिलांना पॅकेजिंग- लेबलिंग आदी विषयाचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. जिल्हास्तरावर व राज्य स्तरावर मिनी सरस, राज्यसरस मेळाव्यातून मोठ्या प्रमाणात या उत्पादनाची विक्री केली जात आहे. याशिवाय आठवडी बाजारातही महिलांचे स्टॉल लावण्यात येत असल्याची माहिती प्रकल्प संचालक सौ. संगीता देवी पाटील यांनी दिली. या कामासाठी शेख शकील यांच्यासह त्यांच्या टीमने मोठे परिश्रम घेतल्यानेच आम्हाला हे उद्दिष्ट गाठता आले असेही संगीता देवी पाटील म्हणाल्या.

### आणखी निधीची गरज

जिल्ह्यातील बचत गटांचे काम प्रगतीपथावर आहे. मात्र काही गटांना अद्याप कर्ज मिळाले नाही. बँकांनी या गटांना कर्ज दिले तर महिला बचत गटांचे काम आणखी जोमाने वाढेल आणि त्यांची आर्थिक प्रगती होण्यासाठी मोठा हातभार लागेल. अशी अपेक्षा उमेद चे शेख शकील यांनी व्यक्त केली

### बचत गटांसाठी प्रत्येक पंचायत समितीमध्ये हक्काचे स्टॉल मिळावेत

जिल्ह्यातील पंचायत समितीमध्ये बचत गटांना उत्पादन विक्रीसाठी हक्काचे स्टॉल मिळाले तर त्यांच्या उत्पादन विक्रीमध्ये वाढ होऊन कायमस्वरूपी त्यांना उत्पादन विक्रीसाठी एक हक्काची जागा मिळेल अशी अपेक्षा बचत गटातील महिलांनी व्यक्त केली.

## स्व.संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना तात्काळ फाशी द्या; घोषणाबाजी करत पाटोदा कडकडीत बंद

पाटोदा । प्रतिनिधी

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे क्रूर पद्धतीचे फोटो समोर आल्यानंतर आज बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आलेली आहे. याच बंदला प्रतिसाद देत पाटोदा तालुका कडकडीत बंद ठेवून छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तहसील कार्यालयावर निषेध मोर्चा काढण्यात आला या निषेध मोर्चात समाज बांधव आक्रमक होऊन प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली. मस्साजोगचे माजी सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा तपास पूर्ण झाल्यानंतर सीआयडीने आरोपपत्र सादर केलं. या आरोपपत्रात संतोष देशमुख यांच्या



हत्येच्या वेळी आरोपींनी काढलेले १५ व्हिडिओ आणि ८ फोटो देखील आहेत. त्यातून अत्यंत क्रूर पद्धतीने संतोष देशमुख यांचा छळ करून त्यांना मारण्यात आल्याचं बघायला मिळत आहे. हे सगळे फोटो सोशल मिडियावर व्हायरल झाल्यानंतर आज पाटोदा बंदची हाक देण्यात आलेली आहे. त्याच पार्श्वभूमीवर पाटोदा शहरात आज समाज बांधव आक्रमक होत बाजारपेठ बंद केली आहे. यावेळी धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत सर्व आरोपींना फाशीची शिक्षा करण्यात यावी अशी मागणी या तरूणांकडून करण्यात आलेली आहे.



## गेवराईत चांडक परिवाराकडून निवासी विद्यालयात मिष्टान्न भोजन

**गेवराई । प्रतिनिधी**

शहरातील चांडक परिवाराच्या वतीने मतिमंद निवासी विद्यालय, गेवराई येथे सामाजिक बांधिलकी जोपासून दिव्यांग विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजन देण्यात आले. यावेळी चांडक परिवारासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

गेवराई शहरातील मतिमंद निवासी विद्यालय, गेवराई या ५० विद्यार्थ्यांच्या निवासी शाळेत दिव्यांग विद्यार्थ्यांना येथील चांडक परिवाराच्या वतीने मिष्टान्न भोजन देण्यात आले. यावेळी गौरव विजयकुमार चांडक, शकुंतला विजयकुमार चांडक, पुजा संजयकुमार चांडक, प्रिया चिराग चांडक, किरण प्रभाकर शेंद्रे, उमेश यलिगार यांच्यासह शिक्षक , शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच दिव्यांग विद्यार्थी उपस्थित होते. संस्थेच्या वतीने त्यांचे प्रशस्तीपत्र देवून आभार व्यक्त करण्यात आले.

## वाल्मीक कराडसह सर्व आरोपींना फाशी देण्यात यावी-पिंगळे,बहीर, बडे, शिंदे

बीड । प्रतिनिधी

हा वाल्मीकि नाही तर वाल्या राक्षस आहे,महाराष्ट्राला हादरून सोडणारी मसाजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या होय. या प्रकरणात पोलीस तपासामध्ये फोटो व व्हिडिओ व्हायरल झाल्यापासून मन सुन्न झाले आहे. संतोष देशमुख यांना मारहाण करताना आरोपींच्या चेहऱ्यावर जो असूरी आनंद होता तो त्यांच्या आकाच्या आशीर्वादामुळेच होता या प्रकरणातील प्रमुख आरोपी वाल्मीक कराड यांच्यासह सर्व आरोपींना फासी देण्यात यावी अशी मागणी युवासेना कार्यकारणी सदस्य तथा संपुर्ण मराठवाडा निरीक्षण विपुल पिंगळे युवासेना बीड लोकसभा निरीक्षक सागर बहीर युवासेना जिल्हा अध्यक्ष रविराज बडे युवासेना जिल्हा अध्यक्ष सुजित शिंदे यांनी केली आहे.

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण मागील तीन महिन्यापासून जिल्हा सह राज्यात गाजत आहे या प्रकरणात आता जे फोटो बाहेर आले आहेत त्यावरून असे दिसते की सरपंच संतोष देशमुख यांना अमानुष मारहाण करत मानवता कलंकित होईल असे कृत्य या आरोपींनी केले आहे. विशेष म्हणजे या सर्व गुन्ह्यामध्ये त्यांना साथ देणारा वाल्मीक कराड हाच मास्टर माईंड आहे. या सर्व आरोपींना तात्काळ फासावर लटकवावा यापुढे महाराष्ट्रात व बीड जिल्ह्यात अशा घटना करण्यास कुणीही धजावणार नाही. किळश येणाऱ्या घटनेची जेवढे निषेध करता येईल तेवढे कमीच आहे . मनात अत्यंत वेदना होत असून वाल्मीक कराड यांच्यासह सर्व आरोपींना फासावर लटकण्याची मागणी युवासेना कार्यकारिणी सदस्य तथा संपुर्ण मराठवाडा निरीक्षक विपुल पिंगळे युवासेना बीड लोकसभा निरीक्षक सागर बहीर युवासेना जिल्हा अध्यक्ष रविराज बडे युवासेना जिल्हा अध्यक्ष सुजित शिंदे वाल्मीक कराड यांच्यासह सर्व आरोपींना फासावर लटकवण्याची मागणी युवा सेनेचे वतीने करण्यात आली आहे.




## तट बोरगाव येथे हरभरा शेतीदीन व ऊस पिक व्यवस्थापन कार्यशाळा

### ऊस पिकाला पाणी देण्यासाठी ठिबक सिंचनचा अवलंब करा -शिवप्रसाद येळकर

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

नॅचरल शुगर, रांजणी व कृषी विभाग, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने तट बोरगाव येथे हरभरा शेती दिन व ऊस शेतीशाळा कार्यक्रम संपन्न झाला. कृषी विभागाच्या वतीने प्रायोगिक तत्त्वावर हरभरा पिकाचे बिजी १०२१६ हे नवीन वाण शेतकऱ्यांना अनुदानित स्वरूपात दिले होते या वाणाच्या लागवडीमुळे प्रति एकर १३ क्विंटल उत्पादन प्राप्त झाल्याचे मनोगत शेतकरी पांडुरंग शितोळे यांनी व्यक्त केले. कृषी सहाय्यक पंडित काकडे यांनी हरभरा पिकाच्या शेतीशाळांमध्ये देण्यात आलेले तंत्रज्ञान कामगंध सापळे वापरणे पाच टक्के निंबोळी अर्काचा वापर करणे माती



परीक्षण आधारित खत व्यवस्थापन केल्यामुळे झालेले फायदे व उत्पादन खर्चात झालेली बचत बाबत माहिती दिली. सरपंच विठ्ठल शितोळे यांनी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) अंतर्गत कृती आराखडा तयार करण्यासाठी करावयाचे नियोजन बाबत चर्चा केली. नॅचरल शुगरचे ऊस विकास अधिकारी शिवप्रसाद येळकर यांनी उपस्थित शेतकऱ्यांना सद्यस्थितीत ऊस पिकामध्ये निदर्शनास येत असलेले कीड, रोग व अन्नद्रव्य कमतरतेमुळे निर्माण झालेली विकृती यांची निरीक्षणे दाखवून व्यवस्थापनाच्या उपाययोजना सुचवल्या तसेच ऊस पिकाला संतुलित खत मात्रा देण्यासाठी नॅचरल शुगर उत्पादित नॅचरल पोटॅश, नॅचरल ऑरगॅनिक फर्टीलायझर, फर्मेंटेड ऑरगॅनिक मॅन्युअर या खतांचा वापर बाबत माहिती देऊन ठिबक सिंचनाच्या माध्यमातून ऊस पिकाचे पाणी व खत व्यवस्थापन केल्याने होणारे फायदे बाबत विस्तृतपणे माहिती देऊन कारखान्यामार्फत ठिबक सिंचन संच बसवण्यासाठीची योजना बाबत येळकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी तालुका कृषी अधिकारी विजयकुमार पवार, कृषी पर्यवेक्षक माचवे, चांगदेव आदमाने व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. असे करा

पान ३ वर













This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# नैतिकता की वैद्यकीय कारण हे स्पष्ट करा, चेष्टा लावलीय का? सुप्रिया सुळेंचा संताप, दादा-भुजबळांना म्हणाल्या, उत्तर द्या!

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडेयांनी राजीनामा दिलाया. दुसरीकडे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि छगन भुजबळ यांनी नैतिकतेवर राजीनामा दिल्याचं म्हटलंय. पण धनंजय मुंडेंनी त्यांच्या ट्विट मध्ये नैतिकतेमधील 'न' चा ही उल्लेख केलेला नाही. हा किती मोठा विरोधाभास आहे. एकीकडे नैतिकतेवर राजीनामा दिल्याचं म्हटलं जातंय, अन् दुसरीकडे वैद्यकीय कारण मुंडेंनी दिलंय. यातून मोठा विरोधाभास दिसतोय. हे खूप भयानक असल्याची टीका



करत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्षा आणि खासदार सुप्रिया सुळे (चझ डींीळूर डींश्रश) यांनी संताप व्यक्त केला आहे.

जी चार्जशीट बाहेर आली. त्यातील फोटो मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांनी पाहिले असतील ना? मग राजीनामा घ्यायला एवढा वेळ का लागला? सुरेश धस आणि अंजली दमानिया यांनी सिडीआर समोर आणलेले आहेत. वाल्मिक कराड आणि धनंजय मुंडे यांचा संवाद हत्येच्या अर्धा तासांमध्ये झालाय, याचा अर्थ काय काढायचा आम्ही? ८४ दिवस याकडे कानाडोळा केला. आता काय म्हणतात नैतिकतेवर राजीनामा दिला. पण ज्यांनी राजीनामा दिले ते वैद्यकीय कारणाने हा निर्णय घेतल्याचं म्हटलं. अहो राज्याला किती फसवणार? सगळं राज्य हताश झालंय. सुरेश धस म्हणतात ते सत्य आहे. धनंजय मुंडे आणि नैतिकता याचा दुरान्वये संबंध येत नाही. ते आज मुंडेंच्या ट्विट वरून स्पष्ट होतो. असेही खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या.

नैतिकता की वैद्यकीय कारणाने राजीनामा दिला, हे आधी स्पष्ट करा. ही माणसं नाहीत, हैवान आहेत. फोटो पाहून राज्य हळहळतोय. बीड हे सुसंस्कृत शहर आहे, तिथं हे हैवान आहेत. अजित पवार आणि छगन भुजबळ यांना हा नैतिकतेने निर्णय घ्यावा, असं वाटलं असेल. मी विरोधात आहे, म्हणून विरोध करणार नाही. मी त्याचे स्वागत करेन. मी या दोन्ही नेत्यांचा आदर करते, ते माझ्यापेक्षा मोठे आहेत. पण मुंडे म्हणतात वैद्यकीय कारणाने राजीनामा दिला. ही काय चेष्टा लावली आहे का? याचं उत्तर त्यांनी द्याव. सर्व नेत्यांनी जे आरोप केलेत याची पारदर्शक तपासणी व्हायला हवी. संतोष देशमुखांच्या हत्येत ज्या कोणाचा हात असेल त्या प्रत्येकाला चौकात फाशी द्यायला हवी. अशी आग्रही मागणी करत खासदार सुप्रिया सुळेंनी संताप व्यक्त केला आहे.

# काशेवाडी येथे एसआरए प्रकल्प राबवावा; आमदार सुनील कांबळे यांची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

काशेवाडी, भवानी पेठ परिसरात एसआरए प्रकल्प अधिकृतरीत्या राबविण्यात यावा आणि नागरिकांची दिशाभूल होऊ नये, यासाठी पुणे महानगरपालिकेने पुढाकार घ्यावा, अशी मागणी आमदार सुनील कांबळे यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे. गुलटेकडी येथील स्व. मीनाताई ठाकरे वसाहतीच्या धर्तीवर हा प्रकल्प राबवावा, असे त्यांनी पत्राद्वारे सुचवले आहे.



आमदार कांबळे यांनी दिलेल्या पत्रानुसार , सध्या काशेवाडी परिसरात काही राजकीय पुढारी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांकडून नागरिकांची फसवणूक केली जात आहे. विविध आमिषे दाखवून, खोटी कारणे सांगून आणि जबरदस्तीने कागदपत्रे जमा करून एसआरए प्रकल्पासाठी संमती घेतली जात आहे. विशेषतः, काही ठिकाणी एका घरातील केवळ एका व्यक्तीची संमती घेतली जात असून, काही ठिकाणी बनावट कागदपत्रे तयार करून बेकायदेशीर संमती मिळवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले आहे.

महापालिका प्रशासनाने अद्याप कोणत्याही बिल्डर किंवा विकसकाला अधिकृत आदेश दिलेला नाही. मात्र, तरीही नागरिकांची दिशाभूल करून परस्पर संमती घेण्याचे काम सुरू आहे. काशेवाडी भागात मोठ्या प्रमाणावर अशिक्षित नागरिक असल्याने त्यांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेतला जात आहे. त्यामुळे हा गैरप्रकार तत्काळ थांबवून नागरिकांना त्यांच्या हक्काचे घरे मिळावीत, अशी मागणी कांबळे यांनी केली आहे. महानगरपालिकेच्या वतीनेच अधिकृत एसआरए प्रकल्प राबविल्यास पारदर्शकता राहील आणि नागरिकांना योग्य न्याय मिळेल, असे त्यांनी या पत्रात स्पष्ट केले.

# दरोडेखोरांचा पोलिसांवर हल्ला; प्रत्युत्तरादाखल आरोपीवर झाडली गोळी

**पिंपरी । प्रतिनिधी**

बहुळ गावातील दरोडा प्रकरणातील दरोडेखोरांना पकडण्यासाठी गेलेल्या पोलिसांवरच आरोपींनी खुनी हल्ला केला. या हल्ल्यात पोलीस उपायुक्त शिवाजी पवार आणि उपनिरीक्षक प्रसन्न जराड जखमी झाले आहेत. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. चाकण पोलीस ठाण्याच्या हद्दीत मध्यरात्री थरारक घटना घडली.



बहुळ येथे काही दिवसांपूर्वी वृद्ध दाम्पत्याच्या घरात घुसून सहा दरोडेखोरांनी चाकू आणि सुरीचा धाक दाखवत लूटमार केली होती. त्यांनी घरातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम लुटून धूम ठोकली होती. या घटनेमुळे परिसरात दहशत निर्माण झाली होती. या प्रकरणाच्या तपासादरम्यान पोलिसांना गुप्त माहिती मिळाली की, दरोडेखोर चिंचोशी गावात आणखी एक दरोडा टाकण्याच्या तयारीत आहेत. त्यानुसार, पोलीस उपायुक्त शिवाजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी सापळा रचला.

दरोडेखोरांना पकडण्याचा प्रयत्न करताच त्यांनी पोलिसांवर थेट कोयत्याने हल्ला चढवला. अचानक झालेल्या हल्ल्यात उपायुक्त शिवाजी पवार आणि फौजदार प्रसन्न जऱ्हाड जखमी झाले आहेत. दरम्यान, स्वतःचा बचाव करण्यासाठी उपायुक्त पवार यांनी प्रत्युत्तरादाखल एक गोळी झाडली. यामध्ये एका आरोपीच्या पायाला गंभीर दुखापत झाली असून, त्याला घटनास्थळीच अटक करण्यात आले आहे. इतर एक आरोपी अंधाराचा फायदा घेत पळून जात असताना त्याला पाठलाग करून पकडण्यात आले.

मुख्य आरोपी सराईत गुन्हेगार, यापूर्वी ९ गुन्हे दाखल

बहुळ येथील दरोडा प्रकरणातील प्रमुख आरोपी सचिन चंदर भोसले आणि मिथुन चंदर भोसले हे पोलिसांच्या रडारवर होते. सचिन भोसले हा अत्यंत सराईत गुन्हेगार असून, त्याच्यावर यापूर्वी ९ गंभीर गुन्हे दाखल आहेत

# युवकांनी घेतले 'सडक सुरक्षा अग्रदूत' प्रशिक्षण

**पुणे । प्रतिनिधी**

आवास फायनान्सियर्स लिमिटेड, राजस्थान रस्ता सुरक्षा सोसायटी, सीआयआरटी, आईडीटीआर व मोटर वाहन विभाग यांच्या वतीने 'आवास यूथ रस्ता सुरक्षा शिक्षण व जागरूकता अभियान'चे आयोजन केले होते. यात २०० युवकांनी 'रस्ता सुरक्षा अग्रदूत' म्हणून प्रशिक्षण पूर्ण करून 'सुरक्षित रस्ते आणि समृद्ध भारत' घडविण्याची शपथ घेतली. या वेळी सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी चंद्रकांत माने हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या अभियानात 'रस्ते सुरक्षाविषयक विशेष प्रशिक्षण' देण्यात आले. सीआयआरटीचे रस्ता सुरक्षा प्रमुख प्रशांत काकडे यांनी हेल्मेटच्या वापराचे महत्त्व स्पष्ट केले आणि वाहनचालकांनी नियमांचे काटेकोरपणे करणे गरजेचे असल्याचे सांगितले. रस्ता सुरक्षा तज्ज्ञ डॉ. वीरेंद्रसिंह राठोड यांनी रस्ता सुरक्षा चक्र योजनेविषयी माहिती देत अपघातग्रस्तांना तातडीने मदत करण्याचे महत्त्व विशद केले. 'आईडीटीआर'चे प्राचार्य संजय ससाणे यांनी युवकांना सुरक्षित वाहन चालविण्याचे महत्त्व पटवून देत सावध राहण्याचे व 'सुरक्षा फक्त एक नारा नसून, ती आपलं जीवन जगण्याची पद्धत आहे' असे सांगितले.

# इलेक्ट्रिक दुचाकी निर्मिती करणाऱ्या कंपनीत लागलेल्या भीषण आगीत दीडशेहून अधिक दुचाकी जळून खाक

**पुणे । प्रतिनिधी**

कात्रज परिसरातील इलेक्ट्रिक दुचाकी निर्मिती करणाऱ्या भूषण एंटरप्रायझेस कंपनीत लागलेल्या भीषण आगीत दीडशेहून अधिक दुचाकी आणि वाहनांचे सुटे भाग जळून खाक झाले. ही घटना मंगळवारी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास घडली. सुदैवाने या आगीत कोणी जखमी झाले नाही.



कात्रज- गुजरवाडी रस्त्यावर साई इंडस्ट्रिअल भागात इलेक्ट्रिक दुचाकी निर्मिती करणारी भूषण एंटरप्रायझेस ही कंपनी आहे. मंगळवारी दुपारी या कंपनीच्या आवारातील दुचाकींना अचानक आग लागली. आग लागल्याचे समजताच कंपनीतील कामगार सुरक्षित बाहेर पडले. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. कंपनीत दोन हजार इलेक्ट्रिक दुचाकी बनविण्याचे सुटे भाग होते.

या कंपनीतील साहित्याने पेट घेतल्यानंतर आग भडकली. आगीने रौद्र रूप धारण केल्याने आकाशात धुराचे लोट पसरले होते. या आगीत अर्धवट बनविलेल्या स्थितीत असलेल्या दीडशेहून अधिक दुचाकी, वाहनांचे सुटे भाग, बॅटरी आणि इतर साहित्य जळाल्याने मोठे नुकसान झाले.

दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच अग्निशामक दलाच्या गंगाधाम, कात्रज, कोंढवा बुद्रूक आणि पीएमआरडीए केंद्रातील सहा बंब आणि १३ पाण्याचे टँकर घटनास्थळी दाखल झाले. कात्रज केंद्रातील अग्निशमन अधिकारी प्रदीप खेडेकर यांच्यासह इतर जवानांनी पाण्याचा मारा करून आग आटोक्यात आणली. आगीचे नेमके कारण समजू शकले नाही, असे मुख्य नियंत्रण कक्षाकडून सांगण्यात आले.

# केक कापण्यासाठी सत्तूर आणि पिस्तूल घेऊन आला अन् ठेकेदाराचा मुलगा गजाआड झाला

**पुणे । प्रतिनिधी**

सार्वजनीक ठिकाणी वाढदिवस साजरा करताना सत्तुर आणि गावठी कट्टा बाळगणाऱ्या एका १९ वर्षीय तरुणास अटक करण्यात आली. तर त्याच्या अल्पवयीन साथीदारास ताब्यात घेण्यात आले. वाढदिवसाचे चित्रीकरण समाजमाध्यमावर टाकण्याच्या हेतूने शस्त्र जवळ बाळगण्यात आले होते.



अनिकेत दिपक गायकवाड (१९ रा. काशेवाडी, भवानी पेठ) असे अटक तरुणाचे नाव आहे. त्याच्याविरुध्द खडक पोलीस ठाण्यात आर्म क्टनूसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खडक पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना पोलीस हवालदार हर्षल दुडम व अंमलदार कृष्णा गायकवाड यांना खबर मिळाली की, घोरपडे पेठ येथील पीएमसी कॉलनीत अनिकेत गायकवाड हा पिस्तुल व लोखंडी सत्तूर घेऊन आला आहे. त्याचा वाढदिवस असून तो केक कापण्यासाठी उभा आहे. त्यानूसार खडक पोलिसांनी काही पथके बनवून संबंधीत ठिकाणी सापळा रचला.

तो त्याच्या साथीदारांसह केक कापण्याच्या तयारीत असतानाच त्याची पोलिसांशी नजरा नजर झाली. यानंतर तो साथीदारांसह पळून जात असताना पथकाने त्याला अल्पवयीन साथीदारासह पाठलाग करुन पकडले. यावेळी पोलीस कर्मचाऱ्यांना थोडी दुखापतही झाली. त्याची अगंझडती घेतली असता पॅन्टमध्ये एक पिस्तूल व दुचाकीत सत्तूर सापडला. त्याचे वडिल ठेकेदार असून त्याचे शिक्षण आठवी पर्यंत झाले आहे. त्याने पिस्तूल कोठून मिळवले याचा शोध घेण्यात येत आहे.

ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत चव्हाण, पोलीस निरीक्षक शर्मिला सुतार, पोलीस निरीक्षक मनोजकुमार लोंढे सहायक निरीक्षक अनिल सुरवसे, उपनिरीक्षक प्रल्हाद डोंगळे , पोलीस अंमलदार हर्षल दुडम, किरण ठवरे, कृष्णा गायकवाड, विश्वजीत गोरे, अक्षयकुमार वाबळे, योगेश चंदेल, मयूर काळे, शोएब शेख यांचे पथकाने केली आहे.

सार्वजनीक ठिकाणी तलवार, सत्तूर आणि कोयत्याने केक कापण्याची क्रेझ गुन्हेगारांबरोबरच किशोर आणि अल्पवयीन मुलांमध्ये वाढताना दिसत आहे. पोलिस अशा प्रकारे वाढदिवस साजरे करणाऱ्यांवर कारवाई करत आहेत. काही गुन्हेगारांची तर धिंडही काढण्यात आली होती. मात्र तरीही असे प्रकार घडताना दिसत आहे.

# स्वारगेट प्रकरणातील पीडितेचा विरोध असताना पुरुष डॉक्टरकडून तपासणी, तरुणीची भेट घेतल्यानंतर वसंत मोरेंचा गौप्यस्फोट

**पुणे । प्रतिनिधी**

स्वारगेट बस स्थानक अत्याचार प्रकरणातील पीडित मुलीचा विरोध असताना पुरुष डॉक्टरांनी तिची तपासणी केली असल्याचा गौप्यस्फोट ठाकरेंच्या शिवसेनेचे नेते वसंत मोरे यांनी केलाय. पीडितेची भेट घेतल्यानंतर वसंत मोरेंनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी याबाबतची माहिती दिली आहे.



वसंत मोरे म्हणाले, तरुणी म्हणाली होती की, फिमेल डॉक्टरांकडून माझी तपासणी करा. कायद्याने फिमेल डॉक्टरने तिची तपासणी करणं गरजेचं होतं. परंतु तिची तपासणी पुरुष डॉक्टरांनी केली. हे भयानक प्रकरण आहे. एवढा विचित्र प्रकार घडल्यानंतर डॉक्टरांना समजलं नाही. ती सुशिक्षित तरुणी आहे. ती फस्ट्रेट झाली. तिला सांगितलं सोशल मीडिया पाहू नको. त्यानंतर ती शांत झाली.

संमतीने हे लोक म्हणतात, पण तो अत्याचार झाल्यानंतर कलकत्त्याला झालेला प्रकार समोर आला. मी गाडीतून उतरल्यानंतर तो मुलगा राईट साईडला गेला आणि मी डाव्या बाजूला ड्रायव्हर आणि कंडक्टर उभे होते तिथे गेले. त्यांना मी सांगितलं तो मुलगा चाललाय त्याने माझ्यावर अतिप्रसंग केलाय. त्याच्या मागे पळाले पण होते. मात्र, तो तिथून पळून गेला. सगळा घटनाक्रम त्याने सांगितला. त्यानंतर त्यांनी मुलीला सांगितलं जाऊद्या वगैरे म्हणून...असंही मोरेंनी सांगितलं.

तिला मानसिक आधार देण्यापेक्षा तिची चौकशी सुरु आहे

पुढे बोलताना मोरे म्हणाले, स्वारगेट स्थानकावरुन ती तरुणी आऊट गेटने बाहेर पडली. जिथे आपण आऊट गेटने बाहेर पडतो. आपण युटर्न घेऊन शकरशेठ रोडला येतो. त्या कॉर्नरला डाव्या बाजूला उभा होता. तिथे तिने जोरात दरा वाजवून गाडी थांबवली. गाडीतून उतरली. तो मुलगा तिच्यासमोर पळून गेला पण तिच्या मदतीला कोणी आलं नाही. ड्रायव्हर कंडक्टर गाडी काढून एसपी ऑफिसपर्यंत गाडी घेऊन गेले. हा घटनाक्रम विचित्र आहे. तिला मानसिक आधार देण्यापेक्षा तिलाच वाटायला लागलंय की मीच आरोपी आहे. ती पीडिता आहे, तिची चौकशी बंद करा.

# आमदार बापूसाहेब पठारे यांची विधानसभेच्या तालिका अध्यक्षपदी नियुक्ती

**मुंबई । प्रतिनिधी**

विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनासाठी विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर यांनी विधानसभेच्या आठ तालिका अध्यक्षांची घोषणा केली. यात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) पक्षाचे वडगावशेरी मतदारसंघाचे आमदार बापूसाहेब पठारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



तालिका अध्यक्ष नियुक्तीवर आमदार पठारे म्हणाले, विधानसभा अध्यक्षांच्या अनुपस्थितीत सभागृहाचे कामकाज सुरळीत चालवण्यासाठी तसेच विविध विषयांवर, विधेयकांवर सखोल चर्चा घडवून आणण्यासाठी 'तालिका अध्यक्ष' म्हणून असलेली जबाबदारी मी पूर्ण निष्ठेने आणि पारदर्शकतेने पार पाडेल. लोकशाही प्रक्रियेला अधिक बळकटी देण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करणे ही माझी प्राथमिकता असेल. तसेच, विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर यांचे त्यांनी आभार मानले.

पठारे हे वडगावशेरी मतदारसंघातून दुसऱ्यांदा निवडून आले आहेत. त्यांना राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय क्षेत्राचा प्रदीर्घ अनुभव आहे. २००९-२०१४ या कार्यकाळात त्यांनी मतदारसंघातील पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, रोजगार निर्मिती आणि नागरी विकासाच्या अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्पांना चालना दिली आहे. सध्याही ते मतदारसंघात करत असलेल्या विकासकामांबद्दल नागरिकांमध्ये सकरात्मक चर्चा होताना दिसते आहे.

लोकप्रतिनिधी म्हणून त्यांच्या कार्यक्षमतेचा अनुभव वडगावशेरीकरांनी यापूर्वीही घेतला आहे व आताही घेत आहेत. विधानसभा सदस्य म्हणून विविध धोरणात्मक निर्णय व मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. पठारे यांच्या या एकूणच अनुभवाच्या पार्श्वभूमीवर तालिका अध्यक्ष या पदाला ते योग्य न्याय देतील, असा विश्वास राजकीय वर्तुळातून व्यक्त केला जात आहे. बापूसाहेब पठारे यांच्यासह योगेश सागर, संजय केळकर, बबनराव लोणीकर, रमेश बोरणारे, दिलीप बनकर, सुनील राऊत व अमित झनक यांचीही तालिका अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली.

# दत्ता गाडे स्त्रीलंपट, तृतीय पंथीयांशीही ठेवायचा संबंध! इतरही कारनामे समोर

**पुणे । प्रतिनिधी**

स्वारगेट बस स्थानकातील लैंगिक अत्याचार प्रकरणी अपडेट समोर आली आहे. पीडित तरुणीचा न्यायालयात जबाब नोंदवला गेला आहे. इन कॅमेरा झालेला हा जबाब लिफाफा बंद पाकिटात न्यायालयात सादर करण्यात आला आहे. तिच्या बाबतीत नेमका काय प्रकार झाला, हे जबाबात सविस्तरपणे मांडण्यात आले आहे. या प्रकरणात आरोपी दत्तात्रेय गाडे याचा नुकताच पोलिसांनी जबाब नोंदविला, तसेच त्याची ससून रुग्णालयात लैंगिक क्षमता चाचणी करण्यात आली आहे. स्थानकाच्या आवारात असलेल्या शिवशाही बसमध्ये प्रवासी तरुणीवर अत्याचार करण्यात आल्याची घटना २५ फेब्रुवारीला घडली होती. तरुणीवर अत्याचार करून पसार झालेल्या आरोपी दत्ता गाडे याला शिरूर तालुक्यातील गुनाट गावातून पोलिसांनी शुक्रवारी मध्यरात्री अटक केली आहे. गाडेला न्यायालयाने १२ मार्चपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे. पोलिस कोठडीत असलेल्या गाडेचा जबाब शनिवारी पोलिसांकडून नोंदविण्यात आला होता. दरम्यान आरोपीबाबत धक्कादायक खुलासे समोर येत आहेत. दत्ता गाडे स्त्रीलंपट, तृतीय पंथीयांशीही संबंध ठेवायचा अशी माहिती समोर आली आहे.



स्वारगेट बलात्कार प्रकरणाच्या घटनेला आज एक आठवडा पूर्ण झाला. स्वारगेट बलात्कार प्रकरणातील आरोपी दत्तात्रय गाडेने अशा प्रकारचे आणखी काही गुन्हे केल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. धमकावून अत्याचार, तसेच विनयभंग केल्याचे गुन्हे केल्यास गुन्हे शाखेकडे तक्रार करण्यात यावी, असं आवाहन पोलिसांकडून करण्यात आलं आहे. या गंभीर घटनेच्या सहा दिवसांनंतर या प्रकरणाचा तपास पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी गुन्हे शाखेकडे सोपवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. गुन्हे शाखेला आरोपी दत्तात्रय गाडे याचा मोबाईल जप्त करण्यासाठी गुनाट गावात पथके पाठवून शोधमोहीम राबवणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. दरम्यान, स्वारगेट पोलिसांनी आरोपी दत्तात्रय गाडे याने गुन्हा करताना वापरलेली पँट सोमवारी (दि. ३) जप्त केली आहे. आरोपीला दोषी सिद्ध करण्यासाठी लागणारे सबळ पुरावे आता पुणे पोलिसांकडे आहेत. गाडेचे अनेक धक्कादायक कारनामे समोर आले आहेत. पोलिसांना तपासादरम्यान दत्तात्रय गाडेचे अनेक कारनामे समजले आहेत. याबाबत काही वृत्तसंस्थांनी सूत्रांच्या हवाल्यानुसार दिलेल्या माहितीनुसार, गाडे हा स्त्रीलंपट आहे. तो तृतीय पंथीयांशीही संबंध ठेवायचा. त्याने तपासात अनेकदा फेरबदल केले. सुरुवातीला त्याने आपण शरीरसंबंध ठेवण्यास सक्षम नसल्याचंही सांगितलं होतं. तर पीडित तरुणीवरच आरोप करत तिला दोषी ठरवण्याचा प्रयत्न केला. मात्र, तपासात त्याने केलेले सर्व दावे फोल ठरल्याचे दिसले. त्याने पैसे देऊन संबंध ठेवल्याच्या दाव्यातही कोणतेही तथ्य आढळले नाही, असंही समोर आलं आहे. मात्र, त्याने केलेले दावे सोशल मीडियाद्वारे व्हायरल झाल्यामुळे स्वारगेट घटनेतील पीडितेला मात्र, मोठा मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. त्याच्या आणि त्याच्या वकिलाने केलेल्या या दाव्यावरून अनेक तर्क वितर्क लावले गेले, त्याचबरोबर एका राजकीय पक्षाच्या महिला नेत्यांनी देखील पोस्ट केल्याने खळबळ उडाली.